बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक २४ | बुधवार,दि.१८ मे २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


## कर्मचाऱ्यांचा जीवावर उठले जिल्हाधिकारी कार्यालय

- सेवासंल्गनेतेच्या भितीने एकाने जीव गमावला,आत्ता दुसऱ्याचाही जीव घेणार काय
- आमगाव तहसील कार्यालयात रिक्त पदांचा डोलारा



**आमगाव:–** जिल्हाधिकारी कार्यालयाने नियम धाब्यावर बसवून सेवानिवृत्तीला एक वर्ष असलेल्या आमगाव तहसील कार्यालयात कार्यरत एका ५७ वर्षीय लिपिकाच्या सेवासलंग्नतेचा प्रयत्न फसल्यानंतर परत एका दिव्यांग कर्मचाऱ्यावर अतिरिक्त कामाचा बोझा देण्याचा प्रकार आमगाव तहसिल कार्यालयात सुरु केल्याचे समोर आले आहे.विशेष म्हणजे जिल्ह्यातील आमगाव तहसिल कार्यालयात सर्वात कमी कर्मचारी कार्यरत असून गेल्या महिन्यातच एक महिला कर्मचारी लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकली. त्यातच एका ५७ वर्षीय कर्मचाऱ्याचा या अतिरिक्त कामाच्या तणावामुळे मृत्यू झालेला असतानाच परत दिव्यांग कर्मचारी असलेल्या व्यक्तीला अतिरिक्त भार देण्याचा प्रकार म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालयात दशकानुदशके ठाण मांडून बसलेल्या कर्मचाऱ्यांची गैरमार्गाने येणारा पैसा खिशात भरण्यासाठीच पाठराखण करुन त्यांच्याकडून असे काम करवून घेत जात असल्याची चर्चा सुरु झाली आहे.

आत्तापर्यंतच्या सर्वच जिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे कानाडोळा करीत त्या ठाण मांडलेल्याची बाजू घेतली होती,मात्र विद्यमान जिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हाधिकारी जे नेहमीच आपण पारदर्शक कार्यप्रणालीला महत्व देणारे आणि कुठल्याही गैरप्रकाराला व नियमबाह्य कामाला आमच्याकडे जागा नाही असे सांगणारे विद्यमान अधिकारीही आत्ता त्या कर्मचाऱ्यांच्यासमोर नांगी टाकून बसले असे म्हणायला काहीही हरकत नाही. सेवासल्गनतेच्या नावावर हे कर्मचारी एकाच ठिकाणी बसले असून यात आमगाव तहसिल कार्यालयातील अनेक कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. कर्मचारी कमी असल्याने तहसिलदार सुध्दा कामाचा व्याप बघून त्रस्त झाल्याचे चित्र बघावयास मिळते.

आमगाव तहसिल कार्यालयात अनेक पदे रिक्त असून येथील बहुतांश कर्मचारी हे त्या तहसिल कार्यालयात कधीच रुजू झाले नाही,उलट वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे लॉबींगकरुन आपली सेवासलंग्नतेची पदस्थापना जिल्हा मुख्यालय असलेल्या जिल्हाधिकारी कार्यालयात करुन घेतली आहे.या कार्यालयातील आंबिद पठाण यांनी देखील अतिरिक्त कार्यभार आणि सेवा सलंग्नेतेनुसार सेवा सलग्न कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयांला अर्ज सादर केलेला होता.परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.त्यातच सेवासंल्गनतेमुळे कमी झालेली कर्मचारी संख्या व रिक्त पदामुळे आमगाव तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन तसेच सामान्य जनतेचे दैनंदिन कामकाज देखील वेळेवर होत नाही.मागील दोन महिन्यांचे कर्मचाऱ्यांचे वेतन हे अद्याप झालेले नाही. या अगोदर देखील श्री पंधरे यांनी देखील जिल्हाधिकारी तसेच संघटनेला पत्र देऊन सेवा सलग्न अतिरिक्त कार्यभार रद्द करण्याबाबत विनंती केली होती. त्यावर देखील कोणताही विचार न झाल्यामुळे दिलेल्या पत्राच्या काही दिवसातच त्यांनी आपले अवेळी प्राण गमावले.

नुकत्याच लाच लुचपत प्रतिबंधक विभागातर्फे घालण्यात आलेल्या झाडीमध्ये आमगाव तालुक्यातील श्रीमती छाया रहांगडाले या पकडल्या गेल्या होत्या.त्यादेखील अनेक वर्षापासून एकाच पदावर एकाच कार्यालयात कार्यरत होत्या. प्राप्त माहितीच्या अनुषंगाने पुनश्च जिल्हाधिकारी कार्यालयात बदलीची प्रक्रिया राबविण्यात येत असून त्यात शासन नियमांना पुन्हा डावलून मुख्यालय न बदलता फक्त कार्यालय बदलून बदली प्रक्रिया पुर्ण करण्याचे काम गोडबोलून पारदर्शकतेचा ढिंडोरा प्रसारमाध्यम व जनतेसमोर मांडणारे अधिकारीच करीत असल्याचे वृत्त आहे.यावरुन त्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून कुणाचे तरी नक्कीच आर्थिक भले जिल्हाधिकारी कार्यालयात होत असावे त्यामुळेच त्यांना त्याठिकाणाहून हलवण्याऐवजी तिथेच ठेवण्यात येत असल्याची चर्चा सुरु झाली असून विभागीय आयुक्तांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करणे गरजेचे झाले आहे.मात्र वरिष्ठ अधिकारी हे आपल्या अधिकारी वर्गाचे सर्व काळेव्यवहार व चुकीच्या कामावरच पांघरुण घालून आपली पोळी भाजून व गोडगोड बोलून मी तो नव्हेत असे भासवून निघून जात असल्यानेही जिल्ह्याचे प्रशासकीय कामकाजासोबतच विकासातही वाटोळे होऊ लागले आहे.

देवरीच्या उपविभागीय कार्यालयात सेवासंलग्न होत असल्याच्या मानसिक तणावाखाली सदर कर्मचारी आला.त्यासंदर्भाने बदली प्रकियेतंर्गत सदर लिपिकाने आपली बदली करण्यात येऊ नये अशी विनंती आमगावच्या तहसीलदाराना केली होती. परंतु त्याच्या अर्जावर प्रशासनाने लक्ष न दिल्याने अर्जदार कर्मचारी यू.बी.पंधरे यांची प्रकृती खालावली आणि बदली थांबविण्यासाठी दिलेल्या अर्जाच्या २८ दिवसानींच या तणावामुळे आपले प्राण गमवावे लागले.त्या अगोदर जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक मेमन जे सेवासलंग्नतेवर देवरी वरुन येथे कार्यरत होते,ते सुध्दा लाचलुचपत जाळ्यात अडकले होते. हे प्रकरण शांत व्हायला असतानाच आमगाव कार्यालयातील एक महिला कर्मचारी लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकल्यानंतरही वरिष्ठांना हे का कळत नाही अशा प्रश्न निर्माण झालेला आहे.

तहसिल व उपविभागीय अधिकारी कार्यालयातील कर्मचारी नोकरीच्या पहिल्या दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालयात ठाण मांडून बसलेत.त्यां सर्वांनी एक लॉबी तयार केली असून त्यातील बहुतांश कर्मचारी हे गोंदिया जिल्ह्याबाहेरचे असल्याचेही निदर्शनास आले आहे. आधीच इतर कामाचा बोझा घेऊन काम करीत असलेले अनेक कर्मचारी कार्यरत आहेत.त्यांना दिलासा देण्याऐवजी त्यांच्यावरच अतिरिक्त कामाचा ताण लावून पारदर्शक कार्यप्रणालीच्या नावावरच भ्रष्टप्रणालीचा कारभार जिल्हाधिकारी कार्यालयात पादर्शकतेच्या नावावर सुरु आहे हे म्हटल्यास वावगे होणार नाही.

त्या पत्रावर प्रशासनाने लक्ष दिले की नाही हा भाग वेगळा असला तरी जिल्ह्यातील महसुल संघटना ही फक्त नावापुरती असून त्या कर्मचाऱ्याला न्याय देऊ शकली नाही. उलट एकाच ठिकाणी प्रतिनियुक्ती व सेवा सलंग्नतेवर दशकानुदशक नोकरी करीत असलेल्यांच्या रक्षणासाठीच तयार झाल्याने आजच्या घडीला तालुकापातळीवरील अनेक कर्मचाऱ्याना या सेवा संलग्न कमचाऱ्यामुळे मानसिक तणावात काम करण्याची वेळ या संघटनेमुळेच आली आहे.

त्यातच मोठ्या संख्येने रिक्त असलेल्या पदांचाही ताण अतिरिक्त कारभार सांभाळत असलेल्या कर्मचाऱ्यावर होऊ लागल्याने महसुल विभागात सेवासंलग्नतेच्या नावावर एकाच ठिकाणी वषीनवर्ष बसलेल्यांना मूळजागेसह इतर तालुक्यात हलवण्याची गरज निर्माण झाली आहे.

## जिल्हा परिषद विषय समिती सभापतीपदी वर्णी कुणाची!



**गोंदिया:** जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्षपदा साठी निवडणूक घेण्यात आली.त्यानंतर विषय समिती सभापती पदाची निवडणूक केव्हा होणार याकडे जिल्हावासीयांचे लक्ष लागले होते. बुधवारी(दि.११)जिल्हा निवडणूक विभागाने जि.प.विषय समिती सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला.२३ मे रोजी दुपारी ३ वाजता जि.प.सभागृहात निवडणूक होणार आहे.त्यामुळे विषय समिती सभापतीपदी कुणाची वर्णी लागणार याकडे जिल्हावासीयांचे लक्ष लागले.

अडीच वर्षाकरिता अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाकरिता मतदान घेण्यात आले. त्यात भाजप,राष्ट्रवादी काँग्रेस, चाबी संघटन आणि दोन अपक्ष यांनी मिळून सत्ता स्थापन केली. अडीच वर्षाकरिता भाजपला अध्यक्ष, तर राष्ट्रवादीला उपाध्यक्षपद मिळाले.आता विषय समिती सभापतीपदाकडे लक्ष लागले आहे. यात दोन अपक्षांना प्रत्येकी एक, चाबी संघटनेला एक आणि भाजपला एक सभापती पद मिळण्याची शक्यता आहे.तर सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार गोंदियाचे माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांच्यानेतृत्वात निवडून आलेल्या ६ जि.प.सदस्यांना कुठल्याही परिस्थितीत सभापतीपद देण्यास राष्ट्रवादी,चाबीसह भाजपच्याही एका गटाने विरोध दर्शवल्याची चर्चा सुरु झाली आहे.तर दुसरीकडे भाजपमधील कार्यकर्ते व निवडून आलेले सदस्य सुध्दा राकाँसोबतच्या युतीने नाराज झाले आहे.तर देवरी तालुक्यातील एक भाजपनेता आपल्याला सभापती हवे यासाठी पक्षाच्या नेत्यांकडे ताकद लावायला सुरवात केल्यानंतर काही नवनिर्वाचित सदस्यांनी सगळी पदे त्यांनाच तर आम्ही कशासाठी असे बोलायलाही सुरवात केली आहे.

यात आरोग्य व शिक्षण, महिला व बालकल्याण, कृषी व पशुसंवर्धन, अर्थ व बांधकाम आणि समाजकल्याण सभापती असे एकूण पाच विभाग आहे. हे यापैकी उपाध्यक्षा कडे नेमका कुठला विभाग दिला जातो , हे देखील महत्त्वपूर्ण ठरणार आहे. तर भाजपच्या सूत्रांनी दिलेल्या माहिती नुसार महिला व बालकल्याण सभापति पदी पोर्णिमा ढेंगे यांची वर्णी लागण्याची शक्यता आहे. तर अर्थ बांधकाम, समाज कल्याण या विभागाची सभापती पदे भाजप स्वत:कडे ठेवणार असल्याची माहिती आहे.

अध्यक्षपद तिरोडा विधानसभा तर उपाध्यक्षपद अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राला देण्यात आले. त्यामुळे आता उर्वरित क्षेत्राचा समतोल साधण्यासाठी तिरोडा, आमगाव आणि सडक अर्जुनी तालुक्यातील सदस्यांना प्राधान्य दिले जाणार असल्याचे बोलले जाते. आमगाव तालुक्यातून हनवंत वट्टी यांच्या नावाची चर्चा आहे.मात्र देवरी तालुक्यातील एका नेत्यांचा वट्टींच्या नावाला विरोध असल्याची चर्चा आहे.तिकडे माजी उपाध्यक्ष रचनाताई गहाणे सुध्दा आक्रमक असल्या तरी भाजप सभापतीपद देतांना विधानसभा व लोकसभा निवडणुकाचे समीकरण लक्षात घेऊनच सभापतींच्या नावावर शिक्का मोर्तब करणार असल्याचे बोलले जात आहे.

जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन करण्यासाठी भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस, चाबी, अपक्ष सदस्यांना सोबत घेत जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन केली. यामुळे भाजपचे संख्या बळ आता ४० वर पोचले असून बहुमताने कोणता निर्णय घेण्यास याची मदत होणार आहे. तर विरोधात केवळ काँग्रेसचे १३ सदस्य असल्याने सभागृहात त्यांनी भूमिका काय राहते हे महत्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे विषय समिती सभापती पदाची निवड करताना भाजप कोणता फार्म्यूला लावते हे महत्वपूर्ण ठरणार आहे.

## स्वराज्य महोत्सवात नाविन्यपूर्ण उपक्रम राबवा-अनिल पाटील




**गोंदिया :** आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत ९ ते १५ ऑगस्ट दरम्यान राज्यभरात स्वराज्य महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. प्रत्येक विभागाने विविध उपक्रम राबवून हा महोत्सव साजरा करावयाचा आहे. स्वराज्य महोत्सवात गोंदिया जिल्ह्यातील सर्व विभागांनी सहभाग घेऊन नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावे असे निर्देश प्रभारी जिल्हाधिकारी अनिल पाटील यांनी दिले. स्वातत्र्यांचे महत्त्व नागरिकांना पटवून देतांनाच आपल्या विभागाच्या फ्लॅगशिप योजना सामान्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी नियोजन करावे, असेही त्यांनी सांगितले.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, उपविभागीय अधिकारी पूजा गायकवाड, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनंत जगताप व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

९ ते १५ ऑगस्ट दरम्यान राज्यभरात स्वराज्य महोत्सव आयोजित करण्याच्या शासनाच्या सूचना आहेत. त्यानुसार प्रत्येक विभागाने नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करून तात्काळ जिल्हाधिकारी यांना सादर करावे असे त्यांनी सांगितले.

यात प्रामुख्याने घरपोच सातबारा वाटप, लाभार्थ्यांना योजनांचा थेट लाभ मिळवून देणे, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे, फ्लॅगशिप राबविणे, शेतकऱ्यांमध्ये कृषी विषयक जनजागृती, शालेय विद्यार्थ्यांचे कार्यक्रम, स्वतंत्र सैनिकांचा सन्मान, लाभार्थी मेळावे, विविध योजनांच्या लाभाचे वितरण, परिसंवाद, जनजागृती रॅली इत्यादी कार्यक्रमाचा समावेश असावा असे ते म्हणाले.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या उपक्रमात शालेय शिक्षण विभागाने जिल्ह्यातील एक विशेष ऐतिहासिक शाळेचा विकास करावा, राज्यात निर्माण केलेल्या हुतात्मा स्मारकांची डागडुजी व सुशोभीकरण करावे, सर्व विभागांनी समन्वय अधिकारी नेमावा, शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभाग यांनी जास्तीत जास्त कार्यक्रमाचे आयोजन करावे, लोकसहभाग वाढवावा व रस्ते संग्रहालय निर्मिती करणे अशा शासनाच्या सूचना आहेत.

जिल्ह्यात नियोजन होणे अपेक्षित असल्याचे श्री. पाटील म्हणाले.जिल्ह्याच्या वैशिष्ट्यपूर्ण घटनांचा नियोजन प्रत्येक विभागाने आपण करत असलेल्या कार्यक्रमाचे अभिलेखे तयार करावेत. कार्यक्रमाचे उत्तम छायाचित्रे घ्यावीत. कार्यक्रमाना व्यापक प्रसिद्धी द्यावी व त्याचा अहवाल वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयाला सादर करावा असे ते म्हणाले.

## गडचिरोलीत नक्षलवाद्यांचा धुमाकूळ,रस्ता कामासाठी आलेल्या वाहनांची जाळपोळ



**गडचिरोली :** जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील मवेली या अतिदुर्गम गावात रविवारी रात्रीच्या सुमारास रस्त्यांच्या बांधकामासाठी आणलेल्या वाहनांची जाळपोळ करण्यात आली. ही घटना सोमवारला पहाटे उघडकीस आली.एटापल्ली तालुक्यात (LWE) योजनेअंतर्गत मवेली ते मोहूली रस्त्याचे काम सुरूहोते. मवेली या गावात रस्ते बांधण्यासाठी आणण्यात आलेली वाहने उभी करण्यात आली होती. रविवारी रात्रीच्या सुमारास नक्षल्यांनी ही वाहने जाळल्याची घटना उघडकीस आली. हे रस्त्याचे काम वल्लभाणी कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी करत असल्याची माहिती समोर येत आहे.

जाळरण्यात आलेल्या वाहनांमध्ये २ पोक्लेन,१ ट्रक आणि एका ग्रेडरचा समावेश असल्याची प्राथमिक माहिती आहे. जवळपास दीड कोटी रुपयाचे नुकसान झाल्याचें सांगण्यात येत आहे. नक्षलवाद्यांनी रस्त्याचे बांधकाम करणाऱ्या वाहनांना लक्ष केले आहे. या जाळपोळीतून जिल्ह्यात नक्षल्यांनी पुन्हा एकदा डोकं वर काढल्याचं दिसून येत आहे.

### नक्षल्यांनी केली होती एकाची हत्या

एटापल्ली तालुक्यातील रामजी तिम्मा वय (४०) या व्यक्तीची पोलिसांचा खबरी असल्याच्या संशयावरून १४ तारखेला नक्षलवाद्यांनी हत्या केली होती. हत्या करण्यात आलेली व्यक्ती याच तालुक्यातील हालेवारा पोलीस मदत केंद्र अंतर्गत समाविष्ट मेंढरी या गावातील रहिवासी होता. हत्येनंतर नक्षलवाद्यांनी त्याच्या मृतदेहाजवळ पत्रके टाकली होती.

सोमवारी उघडकीस आलेली जाळपोळीची घटनाही हालेवारा पोलीस मदत केंद्र अंतर्गत येत असलेल्या मवेली येथील आहे. यामुळे या घटनेने परिसरात सध्या भितीच वातावरण निर्माण झालं आहे.

## नागझिरा व्याघ्रप्रकल्पात मचाण कोसळून पर्यटक जखमी

**गोंदिया–** गोंदिया–भंडारा जिल्ह्यातील नागझिरा व्याघ्रप्रकल्पात बुध्दपौर्णिमेच्या रात्री वन्यजीव विभागाच्यावतीने कोरोनाकाळानंतर पहिल्यांदाच यावर्षी वन्यप्राणी गणनेसाठी पर्यटकांना संधी देण्यात आली होती.त्यानुसार पर्यटक हे वन्यजीव विभागाने सोबत दिलेल्या वनमजुरासोबत रात्रीला मचाणीवर गेले.दरम्यान रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास पिटेझरी गेटपासून काही अंतरावर असलेल्या चुनाभट्टीपरिसरातील एका मचाणासमोरील पाणवट्यावर बिबट आला असता त्या बिबट्याला बघतानांच २ पर्यटकासह वनमजूर हे मचाण तुटल्याने खाली कोसळल्याची घटना घडली.दरम्यान घटनेची माहिती होताच जखमींना रात्री १२.३० च्या सुमारास रुग्णालयात हलविण्यात आले.यातील रायपूर निवासी सत्येंद्र शाहू यांचे दोन्ही पाय मोडले गेले तर हैद्राबाद येथील सचिन थंपी यांच्या गळ्याला बल्लीने चिरल्याने गंभीर जखम झाल्याची माहिती सुत्रांनी दिली.रायपूर निवासी शाहू यांना रात्रीला ३.३० वाजताच प्राथमिक उपचार करुन पाय तुटल्यामुळे रायपूरला रवाना करण्यात आले.शाहू हे छत्तीसगड सरकारमधील एका मंत्र्याचे नातेवाईक असल्याची माहीती समोर आली आहे.तर हैद्राबादचे सचिन थंपी हे व्यवसायिक आहेत.दोघेही अनेकदा याठिकाणी पर्यटनासाठी येत असल्याचे पिटेझरी येथील गाईडंचे म्हणने आहे.

ज्या मचाणीवर हे बसले होते,त्या मचाणींची बांधणीच व्यवस्थीत झालेली नव्हती,त्या मचाणला जे सपोर्ट चांगले मिळायला पाहिजे होते,ते बनवितांना करण्यात न आल्याने मचाण बनविणाऱ्याच्या दुर्लक्षामुळे ही घटना घडल्याचे नागरिकांचे व पर्यटकांचे म्हणने आहे.या घटनेनंतर वन्यजीव विभागात चांगलीच खळबळ माजली असून पर्यटकांचे वजन अधिक असल्यानेच मचाण कोसळल्याची घटना घडल्याचे कारण विभागाच्या वतीने पुढे करण्याची तयारी सुरु असल्याची चर्चा ऐकावयास येत आहे.

अधिक माहिती पान ४ वर

## मामा तलावांचे व्हावे पुनरुज्जीवन

- तलावाच्या बुडीतक्षेत्रानुसार व्हायला हवे पुनरुज्जीवनाचे नियोजन
- जमिनीच्या अकृषक रुपाने तलावाचे निस्तार होऊ लागले कमी
- पायलट प्रोजेक्ट अंतर्गत प्राधान्यक्रमाने व्हायला हवी मामा तलावांची दुरुस्ती

**गोंदिया जिल्ह्यात १४२१ व भंडारा जिल्ह्यात १६०२ मालगुजारी तलावांचे अस्तिव धोक्यात**



खेमेंद्र कटरे

गोंदिया:– पुर्व विदर्भातील पाच जिल्ह्यात मालगुजारी तलावांचे वास्तव्य असून नागपूर वगळता चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया व भंडारा जिल्ह्यात या तलावांची संख्या मोठी असल्याने तलावांचे जिल्हे म्हणून ओळख आहे. मात्र या माजी मालगुजारी तलावांच्या निस्तारक्षेत्रात दरवर्षी होत असलेली घट चिंतनिय बाब ठरु लागली आहे. कुठे सिंचनायोग्य असलेल्या जमिनी अकृषक होऊन त्या बांधकामासाठी वापरल्या गेल्याने या तलांवाचे निस्तारक्षेत्रच कमी झाले. कुठे गोंदिया जिल्ह्यात १४२१ माजी मालगुजारी तलाव, व १६०२ मालगुजारी तलाव भंडारा जिल्ह्यात आहेत.

मुख्य व्यवसाय शेतीच असल्याने तलावांच्या उद्धारावरच येथील अर्थकारण अवलंबून असल्याने हा प्रश्न प्राधान्याने सोडविणे गरजेचे आहे. सिंचनक्षमता कमी झाल्याने मामा तलाव दोन महिन्यात रिकामे होतात. शासनाने तलाव ताब्यात घेतले; मात्र देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले. खोलीकरण केले तरच तलावांचे आणि परिसरातील नागरिकांचे भाग्य उजळू शकते. अन्यथा मामा तलाव नकाशावर राहतील, यात शंका नाही. तलावांच्या खोलीकरणासोबतच तलावातून शेतकऱ्यांच्या शेतीपर्यत जाणारे नहर बनणे गरजेचे आहे. नहरापासून प्रत्येक बांधापर्यत जाणाऱ्या कॅनलचे बांधकाम झालेले नसल्याने पाणी जमिनीत मुरते. त्यामुळे पाण्याचा अपव्यय होतो.

विशेष म्हणजे पूर्व विदर्भातील जलसंकट दूर करण्यासाठी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन आवश्यक आहे. तलावांच्या पुनरुज्जीवनासाठी आराखडा आखताना मात्र काही गोष्टींकडे त्यावेळी दुर्लक्ष केले गेल्यानेच तत्कालीन युती सरकारची ही योजना यशस्वी होऊ शकली नाही. तर पुर्णतःच निस्तारक्षेत्र बंद झाल्याने त्या परिसरातील तलावांचे सपाटीकरण करुन शासकीय इमारती तयार झालेल्या आहेत. तर काही ठिकाणी पांदणरस्ते, गावातील पाण्यासोबत गेलेला गाळ आणि शेतकऱ्यांनी हळूहळू तलावातील जागेवर अतिक्रमण करुन सुरु केलेला उपयोगामुळे या तलावांचे क्षेत्र कमी होऊ लागले हे सत्य समोर येऊ लागले आहे. त्यामुळेच की काय गेल्या ३ वर्षापुर्वी या मालगुजारी तलावांच्या पुनरुज्जीवनासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली होती.

परंतु ते नियोजन पुर्णत ढेपाळले गेले कारण प्रत्यक्ष जमिनीवर असलेल्या अधिकाऱ्याकडून सुचना न मागविता थंडगार कार्यालयात बसून तयार केलेला पुनरुज्जीवन आराखडा कागदोपत्री योग्य असला तरी तो प्रत्यक्षात दुरुस्तीच्यावेळी मात्र निरुपयोगी ठरला असेच म्हणण्याची वेळ आली आहे. सध्याच्या पुनरुज्जीवन आराखड्यासाठी जे मापदंड ठरविण्यात आले, ते योग्य नसल्याने पुर्व विदर्भातील मामा तलावांच्या दुरुस्तीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. त्याकरीता या मामा तलावांच्या पुनरुज्जीवनाचा कार्यक्रम हाती घेतांना तलावाच्या बुडीतक्षेत्रानुसार खोलीकरणाचे दर जोपर्यंत सरकार ठरवणार नाही, तोपर्यंत या तलावांचे पुनरुज्जीवन शक्य नाही.

ज्यावेळी हा पुनरुज्जीवनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला, त्यावेळी १२५०० रुपये प्रती हेक्टरी तलाव खोलीकरणाचे दर निश्चित करण्यात आले होते. जर एखाद्या मामा तलावाचे क्षेत्र हे २० हेक्टरचे असेल तर २.५० लाख रुपये खोलीकरणासाठी मिळाले, त्या खोलीकरणातून फक्त ४००० घनमीटर एवढाच गाळ बाहेर निघेल. मात्र उर्वरित गाळ जी साचलेली आहे, त्याचे काय या गोष्टीचा नियोजनच त्या पुनरुज्जीनव आराखड्यात करण्यात आले नाही. तर दुरुस्तीमध्ये एका तलावावर जरी ३ गेट असतील तर कुठल्याही एकाच गेटची दुरुस्ती करुन निधी खर्च झाल्याचे दाखवून त्या योजनेला यशस्वी दाखवण्याचे काम झाले असले तरी त्या योजनेतून मात्र पाहिजे तसा लाभ झालेला दिसून येत नाही. त्यामुळे मामा तलावांच्या पुनरुज्जीवनाचा आराखडा तयार करतांना वास्तविक प्रत्येक जिल्ह्यातील तलावांची संख्या आणि त्या तलावांमध्ये तातडीने दुरुस्ती असलेले तलावांचे प्राधान्यक्रम ठरवून ५ वर्षाचा आराखडा तयार होणे गरजेचे होते.

सरसकट सर्वच तलावावर निधी खर्च होत असल्याने कुठलाही एकही तलाव पुर्णतः दुरुस्त होत नसल्याने त्या तलावातील पाणी योग्यपध्दतीने पोचत नाही. त्याकरीता तलावांची दुरुस्तीचे प्राधान्य ठरवून एखाद्या तलावाला ५ गेट असतील तर त्या पाचही गेटची संपूर्ण दुरुस्ती ही त्या गेटपासून शेवटच्या शेतापर्यंत पाणी पोचविणाऱ्या कालव्याचीही दुरुस्ती करुन त्या दुरुस्तीच्या कामाला प्रमाणीत करुन घेणे आवश्यक आहे.

तलावांची देखभाल व्हावी व सिंचनाचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पाटबंधारे विभागाकडून वारंवार निधीची मागणी करण्यात येते.मात्र निधीची मागणी करतांना प्राधान्यक्रम न ठरवता सरसकट निधी मागून सर्वांना खुश करण्यासाठीचे कार्यक्रम म्हणजे तलाव दुरुस्ती असे ब्रीद जिल्हा परिषदांनी ठरविल्यानेच आज पुर्व विदर्भातील एकही मामा तलाव हा आमचा मॉडेल तलाव असल्याचे दाखवू शकत नाहीत.

विशेष म्हणजे पूर्व विदर्भातील जलसंकट दूर करण्यासाठी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन आवश्यक आहे.तलावांच्या पुनरुज्जीवनासाठी आराखडा आखताना मात्र काही गोष्टींकडे त्यावेळी दुर्लक्ष केले गेल्यानेच तत्कालीन युती सरकारची ही योजना यशस्वी होऊ शकली नाही.

## संपादकीय

# काँग्रेस पक्षाची अखेरची धडपड

जगातील सर्वात जुनी आणि पाऊणशे वर्षे जुनी अशी आपल्या देशातील लोकशाही अधिक भक्कम करायची असल्यास बहुपक्षीय पद्धतही तितकीच सक्षम असणे गरजेचे आहे. पण अलीकडे देशात भाजप दिवसेंदिवस मजबूत होताना दिसत आहे आणि त्याउलट देशातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेस या सर्वात जुन्या पक्षाची अवस्था मात्र प्रत्येक निवडणुकीनंतर अत्यंत केविलवाणी होताना दिसत आहे. जेव्हापासून भाजपची सूत्रे नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्या हाती सोपविण्यात आली, तेव्हापासून म्हणजे साधारणत: सात वर्षापूर्वीपासून देशात झालेल्या सार्वत्रिक असोत वा राज्य विधानसभेच्या निवडणुका असोत मोजके अपवाद वगळता सर्वत्र काँग्रेसचा दारुण पराभव झालेला दिसला. त्यांच्या ताब्यातील अनेक राज्ये निसटून भाजपच्या ताब्यात गेली. पक्षाची ही केविलवाणी अवस्था होत असताना नेतृत्वाला मात्र त्याचे फारसे गांभीर्य नाही असेच चित्र दिसत होते. पण या जुन्या व देशाची धुरा अनेक वर्षे समर्थपणे वाहिलेल्या काँग्रेसने आता कात टाकण्याचा निर्णय घेतलेला दिसला व तो सुदृढ लोकशाहीच्या दृष्टीने खरंच प्रशंसनीय असाच म्हणावा लागेल.

काँग्रेसने पक्षाला नवसंजीवनी देण्यासाठी आणि आगामी २०२४ सालच्या लोकसभा निवडणुकीसाठी विचारमंथन करण्यासाठी उदयपूर येथे तीनदिवसीय नवसंकल्प शिबीर आयोजित केले होते. काँग्रेसला २०१४ पासूनच्या प्रत्येक निवडणुकीत अपयशाचा सामना करावा लागला आहे. हे अपयशही इतके मोठे होते की, पंजाबसारखी कायम साथ देणारी राज्येही हातातून निसटून गेली. सतत पराभवाची नामुष्की पत्करावी लागत असल्याने काँग्रेसमधील ज्येष्ठ नेत्यांनी काँग्रेसमध्ये फेरबदल करण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले होते. पक्षाचे तरुण व होतकरूनेते राहुल गांधी हे पक्षाला यश मिळवून देत नाहीत, असे या नेत्यांना वाटत होते. म्हणूनच यापुढे पक्षाचे नेतृत्व हे गांधी कुटुंबाबाहेर दिले जावे, असेही या ज्येष्ठ नेत्यांचे म्हणणे होते. त्यातूनच "जी-२३' या काँग्रेसमधील २३ ज्येष्ठ नेत्यांनी त्यासाठी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधींना पत्रही पाठवले होते. या सर्व घडामोडींनंतर उदयपूरमधील नवसंकल्प शिबिराच्या पहिल्याच दिवशी स्पष्ट झाले की, काँग्रेसच्या काही नेत्यांना पक्षाचे नेतृत्व हे गांधी कुटुंबाकडेच असावे, असे वाटते आणि त्याचाच परिणाम एका महत्त्वाच्या निर्णयात दिसून आला व नवसंकल्प शिबिरात "एक कुटुंब एक तिकीट' हा निर्णय घेण्यात आला. मात्र यातून गांधी कुटुंबाला वगळण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या काही काळापासून सतत घराणेशाहीवर बोलत आले आहेत. त्यामुळे घराणेशाहीच्या आरोपावर काँग्रेस काय मार्ग काढते आणि भाजपला कसे प्रत्युत्तर देते याकडे सगळ्यांचेच लक्ष लागलेले होते. "एक कुटुंब एक तिकिटा'चा निर्णय शिबिरात झाला. पण त्यातही काँग्रेसने खोच मारून ठेवली. एकाच कुटुंबातील व्यक्ती पाच वर्षांपेक्षा जास्त काळ पक्षात काम करीत असेल, तर त्यांना तिकीट देण्यात येईल, असा ठराव मंजूर केला.

यावरून काँग्रेस घराणेशाहीच्या बाहेर येण्यास तयार नाही हेच दिसून आले. शिबिराच्या उद्घाटनपर भाषणात सोनिया गांधी यांनी एक अत्यंत महत्त्वाचे वाक्य म्हटले आहे. "वैयक्तिक अपेक्षांपेक्षा पक्षाला वर ठेवले पाहिजे. पक्षाने आतापर्यंत आपल्याला भरपूर काही दिले असून आता परतफेड करण्याची वेळ आली आहे', हे त्यांचे वाक्य. हे वाक्य खूप महत्त्वपूर्ण आहे. काँग्रेसमध्ये अनेक नेते असे आहेत, ज्यांच्या अनेक पिढ्या पक्षात आहेत. पक्षाच्या नावावर या नेत्यांनी प्रचंड संपत्ती गोळा केली आहे. पण जेव्हा निवडणुकीची वेळ येते तेव्हा काही नेते खिशात हात घालायला तयार नसतात. सोनिया गांधींना ही गोष्ट चांगलीच ठाऊक असल्याने त्यांनी परतफेडीचे वक्तव्य केले आहे. पण सध्याची परिस्थिती पाहता काँग्रेस नेते परतफेड करतील का? असा प्रश्न पडतो.

खरं म्हणजे काँग्रेसचे हे काही पहिलेच चिंतन शिबीर नाही. काँग्रेसचे हे पाचवे चिंतन शिबीर आहे. पण यापैकी फक्त एकदाच चिंतन शिबीर घेतल्यानंतर काँग्रेसला निवडणुकीत यश मिळाले आहे. काँग्रेसचे पहिले चिंतन शिबीर १९७४मध्ये उत्तर प्रदेशमध्ये घेतले होते. या चिंतन शिबिरानंतर तीन वर्षांनी इंदिरा गांधींनी देशात आणीबाणी लावली आणि त्यानंतर झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला आणि सत्ताही गेली होती. त्यानंतर राजीव गांधी यांच्या हत्येनंतर पाच वर्षांनी गांधी कुटुंबाकडे पुन्हा काँग्रेसची सूत्रे आली आणि १९९६ मध्ये काँग्रेसने पंचमढीमध्ये चिंतन शिबिराचे आयोजन केले होते. या चिंतन शिबिराचा काँग्रेसला काहीही फायदा झाला नव्हता. तिसरे चिंतन शिबीर २००३ मध्ये शिमला येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी काँग्रेसने विरोधी पक्षांना एकत्र घेऊन मोट बांधण्याचा निर्णय घेतला आणि त्याचा त्यांना फायदाही झाला. २००४ मध्ये काँग्रेस सत्तेवर आली आणि जवळजवळ दहा वर्षे म्हणजे २०१४ पर्यंत राज्य केले. त्यानंतर जानेवारी २०१३ मध्ये काँग्रेसने जयपूर येथे चिंतन शिबिराचे आयोजन केले होते.

या शिबिरात राहुल गांधी यांची काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली; परंतु २०१४ च्या निवडणुकीत काँग्रेसचा प्रचंड मोठा पराभव झाला. खासदारांची पुरेशी संख्या नसल्याने काँग्रेस संसदेत विरोधी पक्ष नेतेपदही मिळवू शकलेली नाही. नंतर २०१९ लाही काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला आणि काही राज्येही गमवावी लागली. काँग्रेसच्या चिंतन शिबिरांचा हा इतिहास पाहता आणि काँग्रेसमधील नाराज नेत्यांची संख्या आणि गांधी कुटुंबाबाहेर नेतृत्वाची झालेली मागणी पाहता उदयपूरमधील हे नवसंकल्प शिबीर म्हणजे काँग्रेसची तग धरून उभे राहण्याची अखेरची धडपड म्हणावी लागेल.

## दवडीपार सेवा सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी देवचंद बिसेन, उपाध्यक्ष चौधरी



**गोरेगांव,:-** तालुक्यातील दवडीपार येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या झालेल्या निवडणुकीत १३ संचालकांच्या निर्विरोध निवडणुकीनंतर आज १७ मे रोजी अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवडणुक सुध्दा निर्विरोध पार पडली.येथील सेवा सहकारी संस्थेवर सर्वपक्षीय ग्रामविकास पॅनलचे उमेदवार बिनविरोध निवडण्यात आले होते.यापुवी सुध्दा यासंस्थेची निवडणुक बिनविरोध पार पडली होती,ती परंपरा यावेळी सुध्दा कायम ठेवण्यात आली.आज १७ मे रोजी झालेल्या संस्थेच्या नवनिर्वाचित संचालकांच्या बैठकीत निवडणुक अधिकारी श्रीमती एस.एस.मारवडे यांच्या उपस्थितीत अध्यक्ष व उपाध्यक्षपदासाठी निवडणुक घेण्यात आली.यात अध्यक्षपदासाठी देवचंद सुखराम बिसेन व उपाध्यक्ष पदासाठी चंद्रभुषण दौलत चौधरी यांची निवड करण्यात आली.सभेला नवनिर्वाचित संचालक देवचंद बिसेन,दसाराम येरणे,जगदिश येळे,रमेश बिसेन,खेमेंद्र कटरे,जियालाल कटरे,केदारनाथ कटरे,सुनिल बिसेन,सिंधुबाई बिसेन,प्रमिलाबाई रहांगडाले,जागेश्वर कुंजाम,चैतराम शेंडे व चंद्रभुषण चौधरी यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक माजी तंटामुक्त समिती अध्यक्ष हि.द.कटरे,मुन्नालाल कटरे,हेतराम पटले,गोपाल पटले,राध्येशाम सोनवणे,संस्थेचे सचिव खुमेश बोपचे आदी उपस्थित होते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# कुणबी-मराठा-ओबीसींना बुद्धाचा अभिमान वाटावा....

जगाला शांती, अहिंसा, समता, प्रेम, बंधुत्वाचा संदेश देणारे सिद्धार्थ शुद्धोधन गोतम यांच्या जयंतीच्या आपणास मंगलमय सदिच्छा.

सिद्धार्थ शुद्धोधन गोतम म्हणजे या भारत भूमीचा भूमिपुत्र, ज्याने जवळ पास २५०० वर्षा पूर्वी इथल्या जाती भेदाच्या, विषमतेच्या भिंती उध्वस्त केल्या आणि समता प्रस्थापित केली. भारतात जन्म लेल्या, भारतातच मानवतावादाची बीजे पेरणाऱ्या तथागताला संपूर्ण जगाने जात - धर्मा पलीकडे जावून स्वीकारले, परंतु ज्या मातीत जन्मले, ज्या मातीत समतेची पेरणी केली त्याच मातीतील आम्ही करंटे मात्र त्यांच्या विचारापासून दूर जात आहोत, नव्हे त्यांच्या करिता आम्ही आमच्या हृदयाची आणि मेंदूची दरवाजे बंद केलेली आहे. बुद्ध म्हणजे ज्ञान. आम्ही असे भारतीय आहोत की जे स्वतःच ज्ञानाला जात आणि धर्माच्या चष्म्यातून पाहतो. आम्हा भारतीयांच्या मनात त्यातल्या त्यात मराठा - ओबीसींच्या मनात तथागता विषयीची नकारात्मक भावना, नकारत्मक विचार इथल्या ब्राम्हणी व्यवस्थेने, मीडियाने रुजविण्याचे काम केले आहे, ते आजही सूरू आहे. आणि आम्ही मराठा - ओबीसी (बहूजन) त्याला बळी पडत आहोत.

तथागत म्हणजे कोण? शेतकऱ्याचा पुत्र. पूर्वी गण व्यवस्था होती. गणाचा प्रमुख निवडताना अनेक निकषांपैकी शेती हा निकष होता. ज्याच्याकडे अधिक शेती आणि पराक्रमी. त्यांना प्रमुख म्हणून निवडल्या जात होते. शुद्धोधनाकडे प्रचंड शेती होती. स्वतः ते शेतात नांगरणी करायचे. दुध-दुभते जनावरे होती. शेती करणाऱ्याला त्या काळात कुणबी म्हटल्या जायचे. म्हणजे शेतकरी. संपूर्ण बहुजन समाजाची धार्मिक आणि सांस्कृतीक नाळ ही शेतीशी निगडित आहे. त्यामुळे तथागत हे आम्हा शेतकऱ्यांचे प्रेरणास्थान असायला हवेत. तथागत लहान असताना म्हणजे बुद्धत्व प्राप्त होण्याआधी त्यांनी पहिले ध्यान शेतात केले आहे. म्हणजे तथागताचे नाते भूमीशी आहे. आम्ही सर्व शेतकरी, मराठा-ओबीसी शेतीवर प्रेम करणारे आहोत. या भूमीपुत्राने मानवाच्या कल्याणाकरिता, समताप्रस्थापित करण्याकरिता राजत्याग, वैभवशाली सुखी संसाराचा त्याग केला व वयाच्या ८० वर्षांपर्यंत समता-करुणेची पेरणी करत राहिले. अशा समतावादी महात्म्याला आम्ही जात-धर्मात बंदिस्त केलं. एकीकडे आम्ही जात मानत नाही म्हणतो तर दुसरीकडे आम्हाला जात एवढी प्रिय आहे की, गरीब कुणब्याला गरीब महार जवळचा वाटत नाही तर त्याला श्रीमंत कुणबी जवळचा वाटतो. गरीब महाराला गरीब माळी जवळचा वाटत नाही तर त्याला श्रीमंत महार जवळचा वाटतो, गरीब माळ्याला गरीब तेली जवळचा वाटत नाही तर त्याला श्रीमंत माळी जवळचा वाटतो. अशी आमची जातीय मानसिकता तयार झालेली आहे. या विचारात आम्हाला बदल करुन तथागतांच्या विचार व कार्याच्या प्रचार - प्रसाराची जबाबदारी त्यातल्या त्यात बहुसंख्य असणाऱ्या आम्हा मराठा-ओबीसींची अधिक आहे.



**बाबासाहेबांना बुद्धाची ओळख :-** २५०० वर्षानंतर जगात बुद्धाचे धम्मचक्र गतिमान करण्याचे काम बाबासाहेब आंबेडकरांनी केले. बाबासाहेबांना बुद्धाची सर्वप्रथम ओळख झाली ती अर्जुन केळूस्कर गुरुजी या शेतकरी-ओबीसी व्यक्तीमुळे. बाबासाहेब दहावा वर्ग उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांचे सत्कार करतांना केळूस्कर गुरुजींनी स्वलिखित बुद्धचरित्र हा ग्रंथ भेट दिला. बाबासाहेबांना बुद्धाची पहिली ओळख झाली ती एका शेतकरी-ओबीसीं व्यक्तिमुळे हे समजून घेणे आवश्यक आहे. भारतात मराठा-ओबीसींच्या बुद्धाचा थांबलेला धम्मचक्र पुन्हा गतिमान केले ते बाबासाहेबांनी. बाबासाहेबांचा आम्हाला किती अभिमान वाटायला पाहिजे होता, परंतु अभिमान वाटत नाही इतके आम्ही करंटे आहोत.

**नास्तिक-आस्तिक:-** वडील शुद्धोधना नंतर शाक्य गणाचे प्रमुख आपणच होणार हे माहित असताना, आपल्या एकुलत्या एका मुलाचा त्याग बहुजनांच्या कल्याणासाठी करून, अहोरात्र फिरत राहिले. कुठलेही शस्त्र हाती न घेता, रक्ताचा एकही थेंब न सांडता, कोणाविषयी द्वेष भावना निर्माण न करता परिवर्तन घडवून मानव जातीच्या इतिहासातील ही असाधारण क्रांती केली म्हणून तथागत नास्तिक..? आणि जे दिवसभर मंदिरात घंटा वाजवून काळा बाजार करतात, लाच खातात ते काय आस्तिक होत..? अरे असल्या आस्तिकांपेक्षा ज्यांनी जनतेच्या दुःख नाशालाच आपले जीवन कर्तव्य मानले अशा तथागता प्रमाणे नास्तिक होणे केव्हाही चांगले.

**पाणी :-** सिद्धार्थ शुद्धोधन गोतमाचे तथागत बुद्ध झाले त्याला अनेक कारण असतील परंतु सर्वात महत्वाचे कारण आहे पाणी. शाक्य आणि कोलीय राज्यांमध्ये रोहिणी नदीच्या पाणी वाटपावरून वाद निर्माण होवून युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. यासंदर्भात चर्चा करण्याकरिता शाक्य संघांचे अधिवेशन बोलविण्यात आले. यात कोलीयां विरुद्ध युद्ध करण्याचा ठराव मांडण्यात आला. या ठरावाला विरोध करतांना सिद्धार्थ म्हणाले, "युद्धाने कोणताही हेतू सफल होत नाही. एका युद्धामुळे दुसऱ्या युद्धाची बीजे रोवली जातात." सिद्धार्थाने युद्धाला विरोध केल्यामुळे शाक्य गणाच्या नियमानुसार तथागताला राज्य व संसाराचा त्याग करावा लागला. पाणी हे जिवन आहे. त्यावर सर्व प्राणीमात्रांचा सारखाच अधिकार असताना, पाण्याकरिता एकाने दुसऱ्याला मारणे म्हणजे मानवतेला मारणे. हा विचार करुन सिद्धार्थाने मानवते करिता गृह व राज्य त्याग केला आणि बुद्ध झाले. पाणी न मिळाल्यास माणूस माणसाला मारायला मागे पुढे पाहत नाही हे छत्रपती शिवाजी महाराजांनी जाणले होते म्हणून त्यांनी गडावर-स्वराज्यात पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही असे पाण्याचे व्यवस्थापन केले. आजही उन्हाळ्यात गडावर पाण्याची टंचाई भासत नाही. पेशवे काळात अस्पृश्य समाजाला जीवन देणाऱ्या पाणी पिण्यावरच बंदी घातली होती. हे महात्मा फुलेंना सहन न झाल्यामुळे आपल्या घरचा पाण्याचा हौद अस्पृश्य समाजाकरिता खुला केला. वडील गोविंदराव यांची ब्राम्हणवाद्यांनी दिशाभूल केली व जोतीराव फुलेंना घराबाहेर काढायला लावले. लोकांना प्यायला पाणी मिळावे या करिता प्रयत्न करणाऱ्या या दोन्ही महात्म्याना गृह त्याग करावा लागला. हा त्याग आम्ही निदान माणूस म्हणून समजून घेणार आहोत काय..? आपल्या कोल्हापूर संस्थानातील जनतेला मुबलक पाणी मिळावं आणि पाण्याकरिता कोणताही वाद निर्माण होवू नये म्हणून त्याकाळातील प्रचंड मोठा राधानगरी धरण बांधला. या सर्व महामानवांच्या विचाराचा धागा पकडून मंत्री असतांना बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांना २४ तास पाणी मोफत आणि मुबलक मिळावं असा प्रस्ताव मंत्रिमंडळात ठेवला होता. त्या काळातील सर्वात मोठे हिराकुंड धरणाची पायाभरणी ही बाबासाहेब आंबेडकर यांनीच केली आहे. पाण्याकरिता युद्ध होवू नये म्हणून नद्या जोड प्रकल्पाची योजना सांगितली. आज पाण्याकरिता रडण्याची वेळ आली असतांना सरकार मूग गिळून गप्प आहे. आज ही बुद्धाने दिलेला संदेश आम्हाला लागू पडतो, म्हणून मराठा-ओबीसींना (बहूजन) बुद्धाचा अभिमान वाटायला पाहिजे.

**शिक्षण व बौद्ध धम्म:-** भारतात सर्व प्रथम समान शिक्षणाला प्रोत्साहन तथागता च्या बौद्ध धम्माने दिलं आहे. आज जशी शाळा व महाविद्यालय शिक्षणाची केंद्र आहेत तशी बौद्ध विहार व बौद्ध मठ ही शिक्षणाची केंद्र होती. बौद्ध भिक्खू आजच्या शिक्षकांसारखे अध्यापन करित होते. बौद्ध धर्मास ज्या भारतीय सम्राटांनी पाठिंबा दिला त्यांनीही शिक्षणास प्रोत्साहन दिले आणि तक्षशिला व नालंदा या विद्यापीठाची निर्मिती केली. पाहता-पाहता हे विद्यापीठे जागतिक शिक्षणाची केंद्रे बनली. कोणताही जाती-भेद न मानता सर्व जाती-धर्माच्या स्त्री-पुरुषांना शिक्षण घेण्याची समान संधी होती. आज मात्र आम्ही ज्यांना निवडून दिले ते सरकार मात्र उच्च दर्जेदार, समान शिक्षण देण्याचं तर सोडाच उलट शिक्षणाची दारे बंद करत आहेत. बुद्धाच नाव घ्यायचं आणि त्यांनी सांगितलेला

बहुजन हिताय बहुजन सुखाय हा संदेश विसरून अल्पजन हिताय, अल्पजन सुखाय या पद्धतीने सर्व कारभार सूरू आहे; म्हणून आर्थिक आणीबाणी च्या काळात कर्ज बुडव्यां कडून सक्तीने कर्ज वसुली करण्याऐवजी त्यांना कर्ज माफी दिल्या जात आहे. शेतकरी विरोधी कायदे बनवून शेतकऱ्यांच्या माथी मारल्या जात आहे. शेतकरी विरोधी कायद्यांना विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांवर गोळीबार करून, देशद्रोही ठरविल्या जात आहे. शेतकऱ्याला, कष्टकऱ्याला आत्महत्या करायला लावल्या जात आहे. सरकारचा हा कोणता मानवतावाद आहे. हे समजायला मार्ग नाही. तथागताच्या जयंतीदिनी सरकारला सुबुद्धी सूचो अशी अपेक्षा करू या..

**अनिल भुसारी, तुमसर जि. भंडारा ८९९९८४३९७८**

# न्यायालय प्रक्रियेत स्थानिक भाषेचा वापर कठीण

स्थानिक पातळीवर न्यायालयातून मराठी भाषेचा वापर करण्यात यावा, यासाठी कल्याणमधील जुन्या पिढीतील एक वकील स्व. शांताराम दातार यांनी आपल्या वकिलीच्या काळात प्रारंभापासून जवळ जवळ ३०-३५ वर्षे लढा दिला. त्यासाठी त्यांनी न्यायालयीन लढाई पण दिली. त्यांच्या प्रमाणेच ठाण्याचे वकील, पत्रकार पं. कृ. भडकमकर यांनीही ठाण्याच्या न्यायालयात एका खटल्यात मराठीतून युक्तिवाद करण्याचा प्रयत्न केला, पण न्यायमूर्ती मराठी भाषिक असूनही त्यांनी ते मान्य न करता त्यांना इंग्रजीतच कामकाज (युक्तिवाद) चालवायला सांगितले.

१९६९मध्ये डोंबिवलीतील महाविद्यालयीन विवाहित विद्यार्थिनी मंदा पाटणकर हिची उपनगरी गाडीत दिव्यातील काही आरोपींनी हत्या केली. या संबंधीच्या खटल्यात सरकारी वकील ॲड. देसाई होते, तर आरोपींच्या बाजूने ठाण्याचे प्रसिद्ध वकील प्रभाकर हेगडे, न. स. माउस्कर, बाबर देसाई, शांताराम दातार अशी मोठी फौज होती. त्यावेळी ठाण्याच्या सत्र न्यायालयात ॲड. प्रभाकर हेगडे यांनी प्रारंभी दहा-पंधरा मिनिटे मराठीतून युक्तिवाद केला, पण न्यायाधीशांनी त्यांना मध्येच रोखून इंग्रजीत युक्तिवाद करण्यास सांगितले. दातार वकिलांनीही कल्याणात याच मुद्यावर (विषयात) ठाणे जिल्ह्यातील वकिलांची आचार्य अत्रे नाट्यगृहात आयोजित केलेल्या परिषदेला मुंबई उच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायमूर्ती अभय ओक यांच्यासह अन्य दोन न्यायमूर्तीही उपस्थित होते.

कल्याणच्या मराठी साहित्य परिषदेनेही ॲड. शांताराम दातार यांच्या न्यायालयीन कामकाज मराठीतून चालावे या मागणीचा पाठपुरावा केला. त्यांनीही कल्याण व अन्यत्रही परिषदांचे आयोजन केले. अ. भा. मराठी साहित्य संमेलनात मात्र या संबंधात काही आवाज उठलेला पाहायला मिळाला नाही. हे एक आश्चर्य म्हणावे लागेल.



गेल्या आठवड्यातच दिल्ली येथे मुख्यमंत्री आणि उच्च न्यायालयाच्या दिल्लीतील संयुक्त परिषदेत, दिल्लीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या एन. व्ही. रमणा यांनी सांगितले, देशात हिंदी आणि भाषिक वैविधता यात वाद सुरू असताना कायदेशीर प्रणालीसाठी आता न्यायालयांमध्ये स्थानिक भाषांचा वापर करण्याची वेळ आली आहे. सरन्यायाधीश यांचे हे म्हणणे म्हणजे कल्याणातून ॲड. शांताराम दातार यांनी न्यायालयातून मराठीचा वापर करण्याच्या मागणीला एक प्रकारे दुजोराच म्हटला पाहिजे. अर्थात सरन्यायाधीशांनी सुचवलेला बदल हा एका दिवसात होणे कठीण असल्याचे त्यांनीच नंतर प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. विशेष म्हणजे, या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदीही उपस्थित होते. त्यांनी सर्वसामान्य लोकांना न्यायालयीन प्रक्रियेशी जोडण्यासाठी आणि न्यायालयीन प्रक्रियेवरील त्यांचा विश्वास वाढण्याच्या दृष्टीने न्यायालयातून स्थानिक भाषांना प्रोत्साहन मिळाले पाहिजे. त्यासाठी त्याच भाषेत न्यायालयाचे काम झाले पाहिजे, असे सांगितले.

न्यायालयाचे आजचे कामकाज पहिले, तर ते इंग्रजीत चालते. न्यायाधीशांसमोर जे साक्षीपुरावे येतात व समोरचे वकील जो युक्तिवाद करतात, तो किती प्रभावीपणे करतात त्यावर न्यायालयाचा निकाल अवलंबून असतो. असे म्हटले, तर चुकीचे होणार नाही. म्हणूनच न्यायालयात न्याय मिळतोच असे नाही. पण न्यायालयात न्यायाधीश जे सांगतात, निर्णय देतात त्याला "न्याय" म्हणतात, असे ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ म्हणतात आणि ते वास्तवही आहे.

एका पक्षाचे वकील पुरावे सादर करून न्यायालयात आपल्या अशीलाची बाजू मांडतात, तर हे पुरावे कसे योग्य नाही, हे दाखवण्याचा प्रयत्न ज्यांच्यावर खटला आहे, त्या पक्षाचे वकील न्यायालयासमोर आणण्याचा प्रयत्न करतात. हे सर्व काम इंग्रजीतून चालते ते सर्वसामान्यांना समजेलच असे नाही. त्यामुळे आपल्या वकिलाने जी बाजू मांडली, ती योग्य की अयोग्य हे संबंधिताला समजत नाही.

न्यायालयीन प्रक्रिया संबंधित व्यक्तीला समजून घेण्याचा अधिकार असल्याने त्याला समजेल, अशा भाषेतच न्यायालयाचे काम चालले पाहिजे. न्याय व्यवस्थाही आपल्या संविधानाचे रक्षण करणारी आहे. पण अलीकडच्या काही खटल्यात काही न्यायालयांकडून हे तत्त्व पाळले गेले असे नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे न्यायाधीशांना स्थानिक भाषा समजेलच असे नाही. त्यामुळेच न्यायालयात स्थानिक भाषेचा वापर करण्यात अडथळे येत आहेत.

## महागाई विरोधात आंदोलन

**गोंदिया:** सातत्याने वाढत असलेल्या महागाईच्या विरोधात भारतीय मजदुर संघ विदर्भ प्रांतच्यावतीने भारतीय मजदुर संघ जिल्हा गोंदियातर्फे आज १७ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.त्यानंतर मुख्यमंत्री यांच्या नावे असलेले निवेदन उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले.यावेळी अध्यक्ष पवन कनोजे, सचिव प्रमोद नांदुरकर,जितेंद्र शतीसेवक,गणेश चौहान तसेच वरिष्ठ सलाहकर आर.बी.चौंबे,राजेश सोनवणे उपस्थित होते.निवेदनात पेट्रोलचे दर कमी करण्यात यावे.खाद्यपदार्थ व भाजीपाला, अन्नधान्य यांचे दर नियंत्रणात ठेवण्यात यावे.विजेचे दर कमी करावे.राज्य सरकारने महागाईवर विविध उपाययोजना करून नियंत्रणात आणावे.खाजगी वाहतुकीच्य प्रवास भाड्यावर निर्बंध आणावे आदी मागण्यांचा समावेश होता.आंदोलनात सोमेश न्ययकरे, महेन्द्र चौहान, वेद ट्रे, जीवन कुंभरवर, हेमंत श्रीपती, कमलेश वैद्य,विजय राऊत व ईतर कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# हिंदुत्व न्याय नाही

मानवजातीच्या इतिहास हा ज्ञानाचा विकास हा ज्ञानाचा इतिहास बनला आहे. इतिहास हा ज्ञानाचा अडसर जेव्हा होतो तेव्हा ज्ञान व इतिहास यांचा अनेक अंगाने स्वतंत्र विचार करणे अत्यावश्यक ठरते मानवी ज्ञान विज्ञान व तंत्रज्ञानाची सतत विकसित होत जाणारी नित्य नूतन अवस्था आहे. विज्ञान-तंत्रज्ञान हे मानवी जीवनाचे जातीचे भेदक व वेधक डोळे होत आहेत. पण जगभर ज्ञानाचा विकास हा या दोन साधनांच्या सापेक्ष अंगाने आता करण्यात येत जरी असला तरी धर्माच्या अंगाने विचार करणारे जगभर खुप जनसमुदाय आहेत. तरीही आधुनिक जगात बुद्धिप्रामाण्य वादाचे चिकित्सेचे ज्ञान पर्यावरण तयार होत आहे. ही सुद्धा आशादायी आणि आनंददायी गोष्ट आहे भारतामधील हिंदुत्व हा श्रद्धा आणि मोक्ष यांच्या दोन दुवा मध्ये अडकलेला असा पर आत्म ज्ञानाचा गुंतागुंतीचा प्रदेश आहे.

या प्रदेशात मोक्ष व श्रद्धा दोन्ही घटक खूप जीवन व्याप्त ठरतात हे मोक्ष ही कल्पना आहे. तर श्रद्धा आहे वर्तन आहे. सध्याच्या काळात असंख्य वैयक्तिक व सार्वजनिक हिताच्या भावना आहेत तर निती व आचरणाचे निश्चित संकल्प असतात त्यामुळे हिंदुत्व आणि श्रद्धा हिंदुत्व आणि मोक्ष यांचा धर्माचरणाच्या अंगाने विचार करणे धर्म वर्तनाचे अधिकार आणि वर्तनाचे नियम सतत समजावून घेणे हिंदुत्व समजून घेण्याचा प्रकार आहे.

श्रद्धेचे नियम व मोक्षाच्या कल्पना या धर्म श्रद्धेच्या अंतर्गत येतात तसेच श्रद्धेचे प्रकार आणि घालून दिलेली कर्मकांडे यांच्या अनुपालन करणे हेसुद्धा हिंदुत्व समजून घेण्यासारखे आहे. एकूणच हिंदुत्व आहे मोक्ष कल्पना धर्म श्रद्धांचे नियम आणि आचारसहिता तसेच श्रद्धेचे विविध प्रकार या तिन्ही विभागावर हिंदुत्व उभे राहिले आहे. असे म्हणता येते हे तिन्ही घटक सहज वेगवेगळे नाहीत मोक्ष श्रद्धा ही संलग्न आहे श्रद्धा आणि कर्मकांडे ही संलग्न आहे.

श्रद्धेचे प्रकार आणि मोक्षाची प्राप्ती ही एकमेकांशी जोडलेले असतात. त्यामुळे हिंदुत्व ही एक राज्य व्यवस्थेने दिलेल्या अर्थातच लाभलेल्या श्रद्धेचे साधन असून ते जीवनाच्या जगण्यातील श्रेष्ठ असे उद्दिष्ट बनवण्यात आलेले असते. त्यामुळेच हिंदुत्वाच्या विरोधात उभी राहिलेली चार्वाक सारखी नास्तिक दर्शने ही शत्रू वाटतात एका बाजूला हिंदुत्व हेच श्रद्धेचे साधन बाळगा वयाचे आणि त्याच वेळेला आनंद आणि वेदना हिंदुत्वाच्या जंजाळ प्रदेशात शोधत राहण्याच्या यामध्ये त्या धर्मश्रद्ध भाविकांचे जीवन संपून जाते.

चार्वाक इथे खूप आव्हानात्मक भूमिका पार पाडतो. आनंद आणि श्रद्धा आनंद आणि कर्मकांडे हेच श्रद्धेचे आधार असले पाहिजेत. चार्वाकाचा मध्ये मोक्ष या कल्पनेच्या आशा वादात जीवन व्यतीत करणे हे योग्य नाही उलट वर्तमानाचे जीवन हे कसे सतत आनंदी करता येईल याचे सर्वोच्च उद्दिष्ट मानवी जीवनाला ठरवता येते आणि तेच खरे वादी आनंदी जीवन साध्य होय हिंदुत्व हे कर्मविपाकच्या आचरण सिद्धांतात व्यक्तीला आयुष्यभर जखडून ठेवते. आणि धर्माने दिले वर्तनाचे जाचक नियम पालन करण्यात त्याचे जीवन शोषित घटक म्हणून संपवून टाकते. असा हिंदुत्वाचा श्रद्धा वाद भयावह आहे हिंदुत्व आहे स्वतंत्र प्रज्ञेच्या बुद्धी इज मला सतत नाकारतो याची कारणे काय हिंदुत्वात बुद्धीला महत्त्व नाही हिंदुत्वात अंधश्रद्धा प्रमाण आहे तर बुद्धी जम मध्ये कोणत्याही प्रकारच्या धर्म श्रद्धेला वाव नाही. किंबहुना बुद्धी मध्ये ईश्वर श्रद्धा नाही हिंदुत्वाच अतीत याची सतत भीती घातलेली आहे अतीत हे कळत नाही. श्रद्धा तिथे थांबते असे सांगून एका मुख्य कल्पनेच्या अद्भुत भयकारी मानसिक अवस्थेत व्यक्तीला श्रद्धा बद्ध करून ठेवले जाते आणि हेच हिंदुत्वाचे बंदिस्त पण आहे. बंदिस्त पण जितके जास्त तितकी जीर्णता टिकून ठेवता येते हिंदुत्व असे सर्व सामर्थ्य पुराण प्रियता टिकवण्यात आहे. म्हणून हिंदुत्व यामधील मोक्षाच्या कल्पनेचा अनेक अंगाने पूर्वक विचार झाला पाहिजे तो केला गेला पाहिजे.

हिंदुत्वातील धर्मग्रंथ हे असेच अति व श्रद्धेचे जंजाळ प्रदेश आहेत. तिच्या श्रद्धेला स्थिरता नाही श्रद्धेला कारणांचा आधार नाही इथे श्रद्धेला प्रश्न विचारता येत नाहीत. इथे श्रद्धेच्या निर्माणाच्या तळाशी जाता येत नाही. इथे श्रद्धा रोपण केले जाते श्रद्धा रोपण करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांची एक प्रभुत्व सत्ता स्वतंत्रपणे कार्यरत असते. तीच आबाधित प्रत्येक श्रद्धेचा व्यापार करीत असते आणि त्यामुळे श्रद्धा ही नेहमी सर्वोच्च चिकित्सा न करता स्वीकारणे बाळगणे तिचा प्रसार करणे यासारखे भाबडे वर्तन हिंदुत्वा मध्ये सतत अभिप्रेत आहे.

हिंदुत्वाच्या कर्मकांडांना अचिकित्सक वर्तन प्रिय असते आग्रही असते म्हणून भरताड धर्मग्रंथांची निर्मिती सतत केली जाते ती वाढवली जाते. आणि त्यातूनही श्रद्धा राजकारणाचे शोषणाचे चे अर्थकारण सतत चालू ठेवले जाते. हे हिंदुत्वाचे अंतरंगाचे खरे स्वरूप आहे हिंदुत्व हे आनंद राग आणि दुःख या मानवी स्वाभाविक भावभावनांना श्रद्धा अडकवते आणि व्यवहारातील भूमिका अनुसूचित ठरवते. असेच हिंदुत्व मृत्यू हत्या दुःख दारिद्र्य विषमता अत्याचार यांच्याबद्दल त्या श्रद्धावंत भाविकाच्या स्थितप्रज्ञ मानसिक तिचे कौतुक करते आणि स्थितप्रज्ञ अवस्था हेच हिंदुत्वाचे प्रत्येक व्यक्ती अंगी अत्यावश्यक असलेले असे आनंद व दुःख विरोधी खोटे समर्थन वादी अतीत भावावस्था चे वर्तन हे महत्त्वाचे आहे.

असा हिंदुत्वाचे ज्ञानी प्रचार करीत असतात व्यक्तीच्या जीवनात निर्माण होणारे दुःख क्रोध नैराश्य विषमता या कारणांचा शोध घेण्यापेक्षा प्रयत्न करण्यापेक्षा मनाची या सगळ्या प्रश्नांकडे संतुलित पणे पाहण्याची अंतर्दृष्टी व्यक्तीच्या अंगी निर्माण झाली पाहिजे. असा हिंदुत्वाचा जो असे आहे तू असे अत्याचार दुःख रक्तपात आणि हिंदुत्वाच्या विरोधात आड आलेल्या व्यक्तींच्या केलेल्या हत्या यांच्याकडे पाहताना मनाची स्थितप्रज्ञता प्राप्त झाली पाहिजे. असा हिंदुत्वाचा आंतरिक संदेश प्रत्येक श्रद्धावंत यांच्या मनामध्ये रुजवण्यात हिंदूतू यशस्वी झालेले असते. हिंदुत्व यामुळेच तर धार्मिक परंपरेचा पगडा आणि वर्चस्व धर्म श्रद्धेचा भय वाद वाढवून टिकवून ठेवते हे आजही वर्तमानात चालू आहे.

कर्मकांडाच्या आचरण पद्धती सतत हाती देत राहणे आणि अ चिकित्सक श्रद्धावंत तू एकटा आहेस तुझ्या अस्तित्व हेच तुझे श्रद्धेचे साकारलेले रूप आहे तुया श्रद्धेच्या संवर्धनासाठी जगले पाहिजे. हे हिंदुत्वाचे सारभूत परिणाम आहेत. तुझ्या वैयक्तिक इच्छा आणि आकांक्षा यांना धर्मश्रद्धा याच्यापुढे महत्तव नाही. उलट सुलट तुझा नको तुझे यश तुझी कृती आणि तुझ्या इच्छा या धर्म श्रद्धेवर अवलंबून ठेव अशा प्रकारचा परावलंबन वाद हे हिंदुत्वाचे एक हिणकस वेगळे रूप आहे.

तुझ्या दुःख आणि आनंदाला तूच कारणीभूत आहे. अशा प्रकारचा आधार शून्य विचार हिंदुत्व प्रत्येक व्यक्तीच्या अंतकरणात रुजवते दुःखाने आनंद याची कारणमीमांसा हिंदुत्व करू देत नाही उलट श्रद्धेच सामर्थ्य व संचय व व्यवस्थेची कृपा यातून जे प्राप्त होईल यावर समाधान मानावे असा हिंदुत्वाचा आग्रह असतो. व्यक्तीला प्राप्त झालेले जीवन आणि सामाजिक पर्यावरण यांच्या एकूण परिणामातून प्राप्त होणारे सुखदुःखाचे प्रसंग आणि घटना यांच्याबाबत सतत भयकारी कल्पनांच्या ओझ्याखाली चिरडुन भरडून जगणे बहुसंख्या चे चालू आहे. हे हिंदुत्वाचे परिणाम स्वरूप आहेत या सर्वांच्या साठी मोक्षाची साधन करता आली पाहिजे.

या आपल्या हिंदुत्व च्या कल्पना व आविष्कारचे महाभयंकर मोठे हे स्वरूप आहे. मोक्ष आणि आत्मा हिंदुत्वाची ही भय हत्यारे आहेत थोडक्यात हिंदुत्व हे न्याय तत्त्व आणि दुःख कारण शोध आणि उपाय योजना च्या आधारे ज्ञान निकषांच्या कुठेच जवळपास पोहोचत नाही. व हे निकष ही स्वीकारत नाहीत भारतामधील त्यामुळे तर हिंदुत्व हे कारण शोधाचे तसेच स्विकाराचे वैज्ञानिक विज्ञान व तंत्रज्ञान विरोधी संस्कृतिक राजकारण आहे हे समजावून घेणे महत्त्वाचे ठरते.

**शिवाजी राऊत सातारा**

# कार्यकर्ता पक्षाचा कणा-आमदार चंद्रिकापुरे



**अर्जुनी मोरगाव:** सामान्य कार्यकर्ता गावाला संघटित करून पक्षाचे ध्येयधोरण स्थानिकात रुजवितो. त्यामुळे स्थानिक भागात पक्ष वाढतो. सशक्त बूथ संघटनेवर लोकप्रतिनिधी निवडून येतो. यावर ग्रामपंचायत पासून पंचायत समिती, जिल्हा परिषद आमदार, खासदार इतर विजयी होतात. त्यामुळे बूथ संघटनेपासून चा सामान्य कार्यकर्ता हा राष्ट्रवादी पक्षाच्या पाठीचा कणा असल्याचे प्रतिपादन आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका अर्जुनी मोरगाव ची सभा कृषी उत्पन्न बाजार समिती अर्जुनी मोरगाव येथील खुले सभागृहात नुकतीच आयोजित करण्यात आली. कार्यक्रमांचे अध्यक्ष आ. मनोहर चद्रिकापुरे, प्रमूख मार्गदर्शक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर, यशवंत परशुरामकर, किशोर तरोने, राकेश जायसवाल, तालुकाध्यक्ष लोकपाल गहाने हे होते.

आ. चांद्रिकापुरे यावेळी म्हणालेत, बूथ कमिटी सशक्त करावे, नवीन कार्यकर्ता नोंदणी करावे, राज्यात, जिल्हा परिषद, नगर पंचायत मध्ये आपली सत्ता आहे, शरद पवार, प्रफुल पटेल नेते आहेत, राजेन्द्र जैन सारखे मार्गदर्शक आहेत. शेतकरी व सामान्य माणसाचे हित साधुन विकासासाठी राष्ट्रवादी कटीबद्ध आहे.

जिल्हाध्यक्ष गंगाधर परशूरामकर म्हणालेत की, आपण सत्तेत सहभागी आहोत. सामान्य व्यक्ती केंद्र मानून नव्याने कार्यकर्ता नोंदणी करावे, तालुका सभेचे नेहमी आयोजन करून अडीअडचणी सोडवावेत. कार्यकर्ता व नेता यांच्यात लोकप्रिनिधींनी सावड कायम ठेवावा. जिल्हा परिषद उपाध्यक्ष अभियंता यशवंत गणवीर म्हणालेत की, मला माझ्यावर नेत्यांनी टाकलेली जबाबदारी पूर्ण करून विकास साधणार, पक्ष मजबूती वर भर देवून आपले ऋण फेडण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सत्कार प्रसंगी म्हणालेत.

नगरपंचायत चे अध्यक्ष सौ. मंजुषा बारसागडे यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले. जिल्हापरिषद उपाध्यक्ष अभियंता यशवंत गणवीर, नगरपंचायत अर्जुनी चे नगराध्यक्ष सौ. मजुषा बारसगडे, सभापती दानेश साखरे, दिक्षा सहारे, नगरसेवक सागर आरेकर, पंचायत समिती सदस्य सौ. पुष्पलता दृगकर, नवनियुक्त युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष किशोर ब्राह्मणकर, युवती अध्यक्षा सौ हर्षाराऊत यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमांचे संचालन उध्दव मेहंदळे, प्रास्ताविक लोकपाल गहाने आभार अनिल लाडे यांनी मानले. यावेळी कार्यक्रमाला यशवंत परशुरामकर, डॉ.दीपक रहिले, राकेश जायसवाल, सुशिला हलमारे, चित्रलेखा मिश्रा, किरनताई कांबळे, निशा मस्के, योगेश नाकाडे, देविदान पालीवाल, रतीराम राणे, आर. के. जांभूळकर, भोजराम राहिले, शालिक हातझाडे, मनोहर शहारे, निप्पल बरय्या, बंडुभाऊ भेंडारकर, नरेन्द्र रंगारी, अजय शहारे, प्रमोद डोंगरे व ईतर मान्यवर उपस्थित होते.

# सारथी,महाज्योतीच्या अधिछात्रवृत्ती लाभार्थ्यांमध्ये भेदभाव!

**नागपूर :** समाजातील विविध घटकांच्या उन्नतीसाठी स्थापन महाज्योती आणि सारथी संस्थेचा विद्यार्थ्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा आहे. सारथीकडून कुणबी आणि मराठा समाजातील विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन एम.फिल. आणि पीएचडीच्या २५० विद्यार्थ्यांना दरवर्षी अधिछात्रवृत्ती दिली जाते, तर बहुसंख्य समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाज्योतीकडून केवळ २०० विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती मिळते. छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) मराठा, कुणबी समाजातील "नॉन क्रीमी लेअर' विद्यार्थ्यांना एम.फिल. आणि पीएच.डी.साठी अधिछात्रवृत्ती देत आहे. या समाजाची लोकसंख्या आणि विद्यार्थ्यांचे प्रमाण लक्षात घेऊन २५० विद्यार्थ्यांसाठी अधिछात्रवृत्ती योजना राबण्यात येत आहे. गेल्या तीन वर्षांपासून आर्थिक सहायची ही योजना सुरू आहे.

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) देखील शैक्षणिक २०२०-२१ पासून अशा प्रकारची योजना राबवत आहे; परंतु ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गाची लोकसंख्या आणि विद्यार्थ्यांची संख्या अधिक असताना केवळ २०० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येत आहे. समाजाची लोकसंख्या बघता किमान ५०० विद्यार्थ्यांसाठी ही योजना असायला हवी, अशी मागणी स्टुडंटस राइट्स असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष उमेश कोरराम यांनी केली.

महाज्योती अधिछात्रवृत्ती २०२२-२३ साठी जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. यात महाज्योती आणि सारथीच्या संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेत तफावत आहे. सारथी पाच वर्षांकरिता अधिछात्रवृत्ती प्रदान करते. प्रथम दोन वर्षांकरिता ३१ हजार रुपये प्रति महिना, पुढील तीन वर्षांकरिता ३५ हजार रुपये, इतर वार्षिक खर्च आणि सरकारी नियमानुसार एचआरए असे या अधिछात्रवृत्तीचे स्वरूप आहे, तर पाचही वर्षे ३१ रुपये अधिछात्रवृत्ती देते; पण एचआरए आणि इतर खर्चाचा त्यात समावेश नाही.

**ओबीसी समाज ५२ टक्के आहे; पण त्या तुलनेत निधी कमी आहे. पाच वर्षांसाठी नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांवर सुमारे ४० कोटी रुपये खर्च होणार आहेत. शिवाय एमपीएससी, यूपीएससी, नीट, जेईई, वैमानिक प्रशिक्षण अशा अनेक योजनांसाठी निधीची आवश्यकता आहे. पीएच.डी.साठी गेल्या वर्षीपर्यंतच्या ७५० विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे या वर्षी पीएच.डी. अधिछात्रवृत्ती कमी विद्यार्थ्यांना देण्याचा निर्णय महाज्योतीच्या संचालक मंडळाने घेतला आहे.**

**- विजय वडेट्टीवार,**
**मंत्री व अध्यक्ष, महाज्योती**

ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसीच्या विद्यार्थ्यांची संख्या तुलनेने कुणबी आणि मराठा समाजापेक्षा अधिक असताना त्यांच्या केवळ २०० विद्यार्थी लाभ देणे अयोग्य आहे, असे कोरराम यांनी सांगितले.

# आसोलीवासियासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली नि:शुल्क पाणी टँकरची सोय



**आमगाव:-** दिवसेंदिवस उन्हाळ्याची दाहकता सतत वाढत असून गावखेड्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ लागली आहे .त्यातच तालुक्यातील आसोली येथे सुध्दा पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होऊ लागल्याने गावातील सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या दोन युवकांनी स्वखर्चाने नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी ट्रक्टरवर पाण्याटी टाकी लावून निशुल्क पाणी देण्यास सुरवात केली आहे.

आमगाव तालुका ओबीसी सेवा संघाचे अध्यक्ष भुमेश शेंडे व सामाजिक कार्यकर्ते मनोज हरिणखेडे यानी ही व्यवस्था आज १२ मे पासून सुरु केली असून त्यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आले.

यावेळी माजी सरपंच रामेश्वर शेन्डे, दीनदयाल बघेले, माजी उपसरंपच आत्माराम तरोणे,रामचंद्र हरिणखेडे, माजी तंटामुक्त अध्यक्ष शिवलाल कटरे, इशूनाथ उके, देवेंद्र पारधी, बालू हरिणखेडे, डाकचंद हरिणखेडे, टोपचंद कथलेवार, दुलिचंद कथलेवार, अनिल बघेले व समस्त गावकरी यांच्या उपस्थितीत या निशुल्क पाणीवाटप सेवेचा शुभारंभ करण्यात आला. आसोली व पाटिलटोला येथील नागरिकांना १०-१५ दिवसापर्यंत निशुल्क पाणी पुरवठा केला जाणार आहे.

# मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री चव्हाण सन्मानित



**गोंदिया:-** गोंदिया शिक्षण संस्थेतर्फे मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांचा स्थानिक एनएमडी महाविद्यालयाच्या सभागृहात १२ मे रोजी आयोजित कार्यक्रमात जाहीर सत्कार करण्यात आला.

संस्थेच्या वतीने संस्थेचे सचिव तथा माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या हस्ते चव्हाण यांना शाल व स्मृति चिन्ह प्रदान करून सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे संचालक निखील जैन,आमदार मनोहर चंद्रिकापुरे, मध्यप्रदेशचे माजीमंत्री तथा आमदार गौरीशंकर बिसेन, खनिज महामंडळाचे अध्यक्ष गुड्डू जयस्वाल, माजी खासदार मधुकर कुकडे, डॉ.खुशाल बोपचे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गंगाराम परशुरामकर, भंडारा जिल्हा बँकेचे अध्यक्ष सुनिल फुंडे, माजी नगराध्यक्ष अशोक इंगळे, नरेश महेश्वरी, राजलक्ष्मी तुरकर यांच्यासह गोंदिया शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य,प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी समर्पित आयोगाचा दौरा जाहीर

**गोंदिया:** :महाराष्ट्रातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायती आणि शहरातील महानगरपालिका, नगरपालिका आणि नगर पंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांच्या मागास प्रवर्गास (इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती) आरक्षण देण्यासाठी सवोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र शासनाने समर्पित आयोग गठीत केला आहे.

महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागास प्रवर्गातील आरक्षणासाठी जनतेची मते जाणून घेण्यासाठी आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संघटना यांची निवेदने स्वीकारण्यासाठी या समर्पित आयोगाने विभागवार कार्यक्रम जाहीर केला आहे. समर्पित आयोग हा शनिवार दि. २१ मे २०२२ रोजी सकाळी ९.३० ते सकाळी ११.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालय पुणे येथे भेट देतील. रविवार दि. २२ मे २०२२ रोजी सकाळी ९.३० ते सकाळी ११.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद तर याच दिवशी सायंकाळी ५.३० ते सायंकाळी ७.३० पर्यंत विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे भेट देतील.

# चौरागडे यांचे उपोषण सुरूच



**गोंदिया:** महामार्गात गेलेल्या शेतीचा बाजारभावाप्रमाणे मोबदला किंवा शासकीय नोकरी देण्याच्या मागणीसाठी चौरागडे यांनी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ३० एप्रिलपासून आमरण उपोषण पुकारले आहे. मात्र नऊ दिवस लोटूनही शासन व प्रशासनाने चौरागडे यांच्या उपोषणाची दखल न घेतल्याने अधिकारी, लोकप्रतिनिधींनी दखल घेतली नाही.

भंडारा जिल्ह्यातील सातोना येथील शकुंतला राकेश चौरागडे यांची गट क्रमांक ५३, ०९ आराजी शेती तिरोडा तालुक्यातील बिरसी तलाठी साझा अंतर्गत होती. कोणताही मोबदला न देता महामार्ग प्राधिकरणाने जमीन संपादित केली. यासंदर्भात चौरागडे कुटुंबीयांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना वारंवार पत्रव्यवहार करून मोबदला देण्याची मागणी केली. मात्र त्यांच्या मागणीला प्रशानाने धुडकावून लावले. अखेर चौरागडे यांनी उपोषणाचे हत्यार उपसत ३० एप्रिलपासून आंदोलनाला सुरुवात केली.

आजच्या बाजारभावाप्रमाणे जमिनीचा मोबदला द्यावा किंवा परिवारातील एका सदस्याला शासकीय नोकरी द्यावी, अशी त्यांची मागणी आहे. आज उपोषणाला ९ दिवस लोटूनही संबंधित जबाबदार अधिकारी आणि लोकप्रतिनिधीने त्यांच्या उपोषणाची दखल घेतली. त्यांची प्रकृती खालावली आहे. आरोग्य विभागानेही त्यांच्या प्रकृतीची साधी तपासणी केली नाही. एखाद्या लोकप्रतिनिधी किंवा पुढाऱ्याने आंदोलन पुकारल्यास संपूर्ण यंत्रणा त्यांच्यासाठी लावली जाते. मात्र, एक शेतकरी आपल्या न्याय हक्कासाठी आंदोलन करीत असेल तर प्रशासन व लोकप्रतिनिधी याची किती गंभीरतेने दखल घेतात, हे चौरागडे यांच्या आंदोलनावरून दिसून येते.

# दोन वर्षांत राजभवनाच्या खर्चात १८ कोटींची वाढ, माहितीच्या अधिकारात उघड



**मुंबई :** एकीकडे राज्यपाल आणि राज्य शासन मध्ये संघर्ष सुरु असताना दुसरीकडे राज्य शासन राजभवनाच्या मागणीवर प्रत्येक वर्षी मोठ्या प्रमाणात धनराशी वितरित करत आहे. मागील २ वर्षात ६० कोटींहून अधिक रक्कम वितरित करण्यात आली असल्याची माहिती आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांस महाराष्ट्र शासनाने दिली आहे. वर्ष २०१९ च्या तुलनेत मागील २ वर्षात राजभवनाच्या खर्चात १८ कोटींची वाढ झाली आहे.

आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी महाराष्ट्र शासनाकडे राजभवन कार्यालयास शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानाची माहिती मागितली होती. अनिल गलगली यांस सामान्य प्रशासन विभागाने अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिकेत अंतर्भूत मागील ५ वर्षाची माहिती उपलब्ध करुन दिली आहे. वर्ष २०१७-१८ मध्ये १३, ९७, २३, ००० इतक्या रक्कमेची तरतुद करण्यात आली होती.

राजभवन कार्यालयाने १२,४९,७२,००० लाख खर्च केले. वर्ष २०१८-१९ मध्ये एकूण तरतुद १५,८४,५६,००० रक्कम होती तर १३,७१,७७,००० इतकी रक्कम खर्च करण्यात आली. वर्ष २०१९-२० मध्ये तरतूद रक्कम १९,८६,६२,००० असताना अधिक रक्कम १९,९२,८६,००० वितरित करण्यात आली ज्यापैकी १७,६३,६०,००० रक्कम खर्च करण्यात आली. वर्ष २०२०-२१ मध्ये तरतुद रक्कम २९,६८,१९,००० होती पण प्रत्यक्षात २९,५०,९२,००० इतकी रक्कम वितरित करण्यात आली आणि त्यापैकी २५,९२,३६,००० रक्कम खर्च झाली. वर्ष २०२१-२२ मध्ये तरतुद रक्कम ३१,२३,६६,००० असताना शासनाने ३१,३८,६६,००० रक्कम प्रत्यक्षात वितरित केली ज्यापैकी राज्यपाल कार्यालयाने २७,३८,५६,००० इतकी रक्कम खर्च केली.

राज्यात महाविकास आघाडीचे ठाकरे सरकार आल्यानंतर राज्यपाल कार्यालयावर उदारता दाखविण्यात आली. मागील २ वर्षात ६०,८९,५८,००० इतकी रक्कम वितरित करण्यात आली ज्यापैकी ५३,३०,९२,००० रक्कम खर्च करण्यात आली. जवळपास १८ कोटींची अधिक रक्कम खर्च करण्यात आली आहे.

अनिल गलगली यांच्या मते राजभवन कार्यालयाने वाढीव खर्चाबाबत माहिती सार्वजनिक करण्यात यावी आणि सर्व खर्चाचे ऑडिट करत त्यास संकेतस्थळावर अपलोड करावी, असे सांगत अनिल गलगली यांनी सदर पत्र राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उप मुख्यमंत्री अजीत पवार यांस पाठविले आहे.

# कोरोना काळात ११ मुले-मुली झाली पोरके



**गोंदिया-** देशावर मार्च-२०२० पासून कोरोना संसर्गाची आपत्ती ओढावली. जीवघेण्या या संसर्गाला समोर जात असताना अनेक संकटांना समोर जावे लागले. अशातच उपचारअभावी म्हणा की, कोरोनाच्या धास्तीने अनेकांना जीवही गमवावे लागले.

गेल्या दोन वर्षात गोंदिया जिल्ह्यात कोरोनामुळे ५८८ जणांचा मृत्यू झाला आहे. या मृतामध्ये ३०३ बालकांनी दोन्ही किंबहुना एक पालकाला गमविले आहे. यात ११ मुले-मुली दोन्ही पालकांचे छत्र हरपल्याने पोरके झाले आहे.

या कुटुंबीयांना शासनाकडून मिशन वात्सल्य या योजनेच्या माध्यमातून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न केले जात आहे. मात्र, हे प्रयत्न खऱ्या अर्थाने लालफितशाहीत सार्थक ठरेल का? याकडेही लक्ष लागले आहे.

मार्च -२०२० पासून वैश्विक महामारीचे स्वरूप घेतलेल्या कोरोना संकटाची आपत्ती देशावर ओढावली. दरम्यान शासन, प्रशासनाकडून या संसर्गाशी लढा उभारताना अनेक उपाययोजनेच्या नावाखाली संचारबंदी लागू करण्यात आली. शिवाय कोरोना संसर्गाच्या वातावरण निर्मितीला बळी पडताना अनेक नागरिकांना उपचारासाठी भटकंती करावी लागली. उवढेच नव्हेतर उपचाराला घेवून आरोग्य प्रशासनाने देखील वाभाडे निघाले. संसर्गदरम्यान अनेकांना जीव गमवावा लागला. कित्येक कुटूंबानी कमावता व्यक्ती गमावला. विशेष म्हणजे, कोरोनाचा भय एवढा होता की, मृत पनालेल्या व्यक्तीची अखेरची भेटही घेता येत नव्हती. अशातही अनेकांनी या आपत्तीचा सामना करीत कोरोना संसर्गापासून स्वत:ला सावरले.

गोंदिया जिल्ह्यात गेल्या दोन वर्षात ४६,२१६ व्यक्ती कोरोनाबाधित आढळले. यातील ४५,४९४ बाधितांनी कोरोना यशस्वी मात केली. तर ५८८ बाधितांचा कोरोनामुळे मृत्यू झाला. मृत पावलेल्यांमध्ये ३०३ मुलांच्या डोक्यावरील पालकांचे छत्र हरपले. यात ६ मुले व ५ मुली असे एकूण ११ मुला-मुर्लीनी दोन्ही पालक गमावले. तर १३५ मुले व १५७ मुली, असे एकूण २६२ मुला-मुलींनी एक पालक गमावला आहे.

# धान खरेदीची अंतिम मुदत ३० जुन पर्यंत वाढवा : आ.अग्रवाल

**गोंदिया:** तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी आ. अग्रवाल यांच्याकडे धान खरेदीच्या आभासी नोंदणी तसेच सातबारा उतारे आभासी झाले नसल्याने होणाऱ्या नुकसानीची माहिती दिली. तसेच धान खरेदीची मुदत ३० जूनपर्यत वाढवून प्रति हेक्टरी ८ क्विंटल धान खरेदीची अट रद्द करून त्या ऐवजी प्रति हेक्टरी ४५ क्विंटल प्रमाणे करण्याची मागणी केली.



दरम्यान शेतकऱ्यांच्या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन आ. अग्रवाल यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तसेच विभागाचे सचिव वाघमारे यांच्याशी फोनवर यासंदर्भात चर्चा केली. तसेच शेतकऱ्यांच्या समस्याचे तत्काळ निराकरण करण्याची मागणी पत्राद्वारे करुन शेतकऱ्यांच्या समस्येचे निराकरण न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे.


Government of Maharashtra

**Deputy Conservator of Forest Division Gondia**

Vanbhavan, T.B.Toli. Kudwa Road, Near Gaytri Mandir, Gondia Ph.No. 07182-235388 Fax-237265

Email:- dyefgondia@mahaforest.gov.in

**E-Tender Notice No. 02/2022-23**

**Providing Gate & Barbed Wire Fencing**

Deputy Conservator of Forests Office, Gondia invites E-Tender for the work listed below, for more details interested bidder should visit website www.mahtenders.gov.in Tender will commence from 13.05.2022

| Sr,No. | Name of Works |
| --- | --- |
| 1 | Prociding Gate & Barbed Wire Fencing At.Navazari Compt.No.373 PF of Tirora Range in Gondia Division |

Size 8 X 8 cm

(स.माहिती-नागश्र/९१/२०२२)

(Kulraj Singh)
Deputy Conservator of forests
Gondia Forest Division


# मातृवंदन योजनेत गोंदिया जिल्हा राज्यात प्रथम

## २२.४७ लाखांचा निधी लाभाथी मातांच्या बँक खात्यात जमा

**गोंदिया:-** मातामृत्यू, बालमृत्यू कमी करण्यासाठी आरोग्य विभागामार्फत केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री मातृवंदना योजनेला कोरोना काळातील टाळेबंदीतही चांगला प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील ४६,६०० मातांची प्रधानमंत्री मातृ वंदना योजना अंतर्गत नोंदणी झाली आहे. २ मेपर्यंत ५०,०४९ मातांच्या बँक खात्यावर २२ कोटी ४७ लाख ९१ हजार रुपयांचा निधी जमा करण्यात आला आहे.

जिल्ह्यात १०७ टक्के मातांना योजनेचा लाभ देण्यात आला आहे. जिल्ह्यात प्रधानमंत्री मातृवंदना योजना अंतर्गत १,४८,१४४ अर्ज प्राप्त झाले. १,३६,३६२ माताना अजार्नुसार या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. योजनेमुळे महिलांची बँक खाते संख्या वाढली आहे. बाळाच्या लसीकरणाचे प्रमाणही वाढले आहे. दारिर्द्यरेषेखालील व दारिर्द्यरेषेवरील अनेक गरोदर महिला ज्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल आहेत अशा मातांना गरोदरपणाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत व प्रसूती झाल्यावर दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी रोज मजुरी करीत असताना अधिक शारीरिक क्षमतेचे काम केल्यामुळे अशा मातांची बालके कमी वजनाची जन्माला येतात व कुपोषणाचे सत्र मातेपासून बालका पर्यंत ओढवले जाते. याची दखल घेत शासनाने प्रधानमंत्री मातृ वंदना योजना सुरू केलेली आहे. लाभार्थ्यांना त्यांच्या आधार बँक खात्यात तीन टप्प्यांमध्ये २ हजार रुपये अदा केले जातात.

या योजनेसाठी लाभार्थी व तिच्या पतीचे आधार कार्ड, लाभार्थ्यांच्या आधार कार्डची जोडलेले बँक खाते, गरोदरपणाची शासकीय आरोग्य संस्थेत १५० दिवसाच्या आत नोंदणी, बाळाचा जन्म नोंदणी दाखला व प्राथमिक लसीकरणाच्या प्रत्येकी आवश्यकता असते. शासकीय अथवा निमशासकीय सेवेतील तसेच खाजगी नोकरीतील ज्या मातांना पगारी प्रसूती रजा मंजूर आहे, अशा मातांना ही योजना लागू होत नाही.

मातृवंदना योजनेच्या अंमलबजावणीत आशा कार्यकती, अंगणवाडी सेविका, गटप्रवर्तक, आरोग्य सेविका, सेवक, आरोग्य सहाय्यक, सहायीका हे लाभार्थ्यांना प्रेरित करीत असून तालुका कार्यक्रम सहाय्यक, तालुका समूह संघटक, वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, जिल्हा समूह संघटक, जिल्हा कार्यक्रम सहाय्यक, तालुका आरोग्य अधिकारी हे सर्व डाटा एंन्ट्री ऑपरेटर यांच्या सहाय्याने अर्ज भरून घेण्याकरिता मदत करतात.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया**

**ई-निविदा प्रणाली अंतर्गत ई-निविदा प्रसिद्ध करणे (अल्प कालावधी)**

**सुचना क्र.०२ (सन २०२२-२३) प्रथम वेळ (मजूर सहकारी संस्था)**

**मजूर सहकारी संस्था यांचेकडून ई-निविदा मागविण्यबाबत.**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया या कार्यालय अंतर्गत मंजूर कामांचे पपत्र बी-१ मध्ये दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, गोंदिया येथे नोंदणीकृत/वर्गीकरण केलेल्या मजूर सहकारी संस्था यांचेकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. प्रसिद्ध कामांची निविदा केवळ ई-निविदा पद्धतीने सादर करावयाची आहे. या निविदेमधील कामाबाबत अटी व शर्ती ई.संपूर्ण माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर निविदा प्रसिद्ध दिनांक १३/०५/२०२२ पासून पाहण्यास उपलब्ध आहेत. तसेच जिल्हा परिषद, बांधकाम विभाग गोंदिया चे नोटीस बोर्डावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याबाबतचे सर्व शुद्धीपत्रके सुद्धा वरील संकेतस्थळावरच प्रसिद्ध करण्यात येतील.

**ई-निविदा पद्धतीचा तपशिल**

| | |
| --- | --- |
| ई-निविदा प्रसिद्धी | दिनांक:-१३/०५/२०२२ पासून |
| ई-निविदा दस्ताऐवज डाउनलोड प्रारंभ (Start) | दिनांक:-१३/०५/२०२२ सकाळी ११.०० वाजेपासून |
| ई-निविदा दस्ताऐवज डाउनलोड समाप्त (End) | दिनांक:-१९/०५/२०२२ चे साय.५.०० वाजेपर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडणे (शक्य झाल्यास) | कार्यकारी अभियंता जि.प.सा.बां.विभाग गोंदिया यांचे कक्षात संबंधित निविदाधारकांचे समक्ष दिनांक:-२०/५/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजेपासून लिफाफा क्रमांक-१ उघण्यात येईल. (शक्य झाल्यास) |

दिनांक-१३/०५/२०२२

स्वा/- (सुमीत एस.वेलपत्रे) कार्यकारी अभियंता जि.प.सा.बां,विभाग, गोंदिया

स्वा/- ( ) मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद, गोंदिया

स्वा/- (शितल व्ही.पुंड) अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, गोंदिया

# नियमबाह्य गतिअवरोधकामुळे अपघाताला निमंत्रण



**गोंदिया:** नियमबाह्य तसेच न रंगविलेल्या गतिरोधकांमुळे अनेक वाहनचालकांना अपघातांना सामोरे जावे लागत आहे. याबाबत संबंधित विभागाचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. मुख्य रस्ते आणि गल्लीबोळांतील मार्गांवरील वाहतुकीची सारखीच परिस्थिती आहे. शासकीय निकषांनुसार ३.६ मीटर म्हणजेच १२ ते १४ फूट असलेल्या रुंद गतिरोधकाची मधली उंची ६ ते ८ इंच इतकी आहे.

मात्र दोन्ही बाजूंनी मुळ त्या असलेल्या या गतिरोधकांची उंची अधिक असली तरी त्याप्रमाणात रुंदी असल्यामुळे वाहने आपटत नाहीत. वाहनांचा वेग मर्यादित असेल तर वाहनचालकांना या गतिरोधकांमुळे कोणताही त्रास होत नाही. मात्र, पालिकेकडून शहरातील रस्त्यांवर वाट्टेल तिथे आणि कसेही गतिरोधक बसविले आहेत.

पालिका खासगी ठेकेदारांकडून रस्त्यांवर गतिरोधक टाकण्याचे काम करुन घेते.ते मात्र ते कोणतेही ते निकष पाळत नसल्याने रस्त्यांवरील गतिरोधक मोठा अडथळा निर्माण करीत आहेत. वाहने सरळ या गतिरोधकावर आदळत आहेत. त्याचबरोबर पालिकेने लावलेल्या रस्त्यांवरील नियमबाह्य गतिरोधकांना दर्शक पट्टे नसल्याने अनेकवेळा हे गतिरोधक दिसून न आल्याने वाहनांचे अपघात होत आहेत. पालिकेकडून करण्यात आलेले एक टक्काही गतिरोधक नियमात नसल्याचे दिसून येत आहे. परिणामी नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

राज्यमार्गासह शहरातील गल्लीबोळांत गतिरोधकांचे अनावश्यक जाळे पसरले आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या इच्छेनुसार गतिरोधक बसविले जात असून गतिरोधकांची उंचीही प्रमाणीत उंचीपेक्षा अधिक असल्याने दुचाकीस्वारांचे हाल होत आहेत. अधिकतर वाहने रात्रीच्या वेळेस गतिरोधकांवरुन आदळत असल्याचे दिसूनसू येत आहेत. यात दुचाकीवर मागे बसलेल्या महिला, नागरिक खाली पडून जखमी होत आहेत. शहरातील गतिरोधकांची पाहणी करून नियमांनुसार गतिरोधक तयार करावेत, अशी मागणी नागरिकांतूनतू होत आहे.

नियमानुसार किती अंतरावर व कोणत्या रस्त्यावर गतिरोधक असावेत याची माहितीच प्रशासनाला नाही. शहरातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, बाजारपेठांतील रस्त्यांवर तर गतिरोधक आहेतच. त्याशिवाय शहरातील गल्लीबोळांतील रस्त्यांवरदेखील गतिरोधक करण्यात आलेले आहेत. याचा त्रास वाहनचालकांना सहन करावा लागत आहे.

# मागासवर्गीयांच्या समर्पित आयोगाचा अभ्यास दौरा की धावती सहल

## आयोगाने एका विभागाला पुर्ण दिवस द्यावा सोबतच नोंदणी कार्यालयाचा क्रमांक व नाव जाहिर करावे

## ओबीसी अधिकार मंचचे सयोंजक खेमेंद्र कटरे यांची मागणी

| दिनांक | वार | विभाग | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| २१ मे २०२२ | शनिवार | पुणे | स. ९.३० ते ११.३० | विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे |
| २२ मे २०२२ | रविवार | औरंगाबाद | स. ९.३० ते ११.३० | विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद |
| २२ मे २०२२ | रविवार | नाशिक | सायं. ५.३० ते ७.३० | विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक |
| २५ मे २०२२ | बुधवार | कोकण | दु. २.३० ते ४.३० | विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन |
| २८ मे २०२२ | शनिवार | अमरावती | स. ९.३० ते ११.३० | विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती |
| २८ मे २०२२ | शनिवार | नागपूर | सायं. ४.३० ते ६.३० | विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर |


**गोंदिया:** – महाराष्ट्रातील ओबीसी, व्हीजेएनटी,एसबीसी प्रवर्गातील सर्व संघटनाप्रमुखासंह सर्वसामान्य जनता व जातीय संघटनाच्या नेतृत्वाकडून समाजाच्या मागासलेपणाची कारणे जाणून घेण्यासोबतच राजकीय आरक्षणाची गरज का आहे यावर मते जाणून घेण्यासाठी सवोॅच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ओबीसी, व्हिजेएनटींना आरक्षण देण्यासंबंधी महाराष्ट्र सरकारने समर्पित आयोग गठीत केला आहे. या आयोगाने जनतेची मते जाणून घेण्यासाठी विभागावार कार्यक्रमाची घोषणा केली.

या कार्यक्रमाकडे बघितल्यास प्रत्येक विभागाला २ तासाचा वेळ दिलेला आहे.एका विभागात किमान ५–६ जिल्ह्यांचा समावेश आहे. त्यामध्ये विभागीय कार्यालयापासून हे जिल्हे १०० ते ३०० किमी अंतरावर आहेत. त्यामध्ये त्या जिल्हयत शेकडोना असलेल्या या समाजातील संघटनाचे प्रतिनिधींशी खरच दोन तासात हे आयोग काय जाणून घेणार आहे.

या आयोगाला खरंच समाजसंघटनाकडून माहिती जाणून घ्यायचे आहे का की शासनाने दिलेला निधी खर्च करण्यासाठी आणि मा.न्यायालयाला सांगण्यासाठी की आम्ही प्रत्येक विभागात जाऊन आलो हे दाखविण्यासाठीचा हा सहल कार्यक्रम आहे असा प्रश्न उपस्थित झालेला आहे. त्यातही आयोगाच्यावतीने आधी आपण विभागीय आयुक्त कार्यालयात आपल्या नावाची नोंदणी करावी असे म्हटले आहे,मात्र आयोगाने त्या नोंदणीसाठी कुठला अधिकारी नेमला,त्याचे नाव काय,त्याच्या कार्यालयाचे दुरध्वनी किंवा भ्रमणध्वनी काय आहे हे अद्यापही जाहिर केलेले नाही,त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. यावरुन सरकारसह ओबीसी बहुजन मंत्रालयाची भूमिका संशयास्पद असल्याचे दिसून येत आहे.

जर गडचिरोली जिल्हयातील सिरोंचा येथील नागरिकाला जर आपले मत मांडायचे असेल तर तेथील व्यक्ती काय नाव नोंदवण्यासाठी आधी एक दिवस येईल. त्यानंतर परत तो आयोगासमोर हजर राहायला येईल त्याचा आर्थिक भुर्दंडाचा विचार केलेला दिसत नाही. त्यात दोन तासाचा दिलेला कालावधी हा राजकीय पक्षाशी संबधित नेते असलेल्यांच्या ओबीसी संघटनानाही अपुरा पडेल मग इतर लहानमोठ्या सामाजिक संघटनाच्या प्रतिनिधींशी हे आयोग खरोखरच संवाद साधेल की त्यांचे कागद घेऊन आपला कार्यक्रमाचा खानापुती करेल असा प्रश्न ओबीसी अधिकार मंचचे संयोजक व राष्ट्रीय पंवार क्षत्रिय महासभेचे संघटन सचिव खेमेंद्र कटरे यांनी उपस्थित केला आहे. आयोगाने आपल्या या कार्यक्रमात फेरबदल करुन नावनोंदणीकरीता अधिकारी व त्यांचे क्रमांक आधी जाहिर करावे सोबतच एका विभागाल किमान एक दिवस पुर्ण द्यावा अशी मागणी केली आहे.

# अवैध तेंदूपत्ता संकलनाला वनअधिकाऱ्यांचेच अभय



**गोंदिया:** जिल्ह्यातील काही वनक्षेत्रामधील तेंदूपत्ता संकलनासाठी गावाच्या वन व्यवस्थापन समितीला अधिकार आहे. या अतंर्गत तेंदूपत्ता संकलन करण्यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती करून देणे व त्यानंतरचे सर्व अधिकार वन व्यवस्थापन समितीकडे असते. मात्र, अनाधिकृतपणे वनविभागाचे अधिकारी तेंदूपत्ता संकलनाचे कंत्राट आवंटित करून गावस्तरीय वन व्यवस्थापन समितीच्या अधिकारावर गदा आणत आहेत. हा प्रकार सडक अर्जुनी तालुक्यातील खोबा येथील वन व्यवस्थापन समितीने उघडकीस आणून या संदर्भात सातत्याने पाठपुरावा केला. मात्र, या प्रकाराकडे दुर्लक्ष करीत वन अधिकारी या गैरप्रकाराल अभय देत आहेत. यामुळे कंत्राटदाराशी अधिकाऱ्याचे साटेलोटे असल्याचा आरोप केला जात आहे.

सविस्तर असे की, गोंदिया जिल्ह्यातील वनक्षेत्रातून मोठ्या प्रमाणात तेंदूपत्ता प्राप्त होतो. या माध्यमातून वनविभागासह वनव्यवस्थापन समितीच्या आर्थिक उत्पन्नात भर पडत असते. त्यातच काही वनक्षेत्र गावस्तरीय वनव्यवस्थापन समितीच्या निस्तार हक्काखाली येतात. त्यामुळे, त्या वनक्षेत्रातील तेंदूपत्ता संकलनाचे अधिकार गावस्तरीय वनव्यवस्थापन समितीकडे असतो. नियमानु–सार वनविभागाकडून कंत्राटदाराची नियुक्ती करुन तेंदूपत्ता संकलनाचे नियंत्रण व अधिकार वन व्यवस्थापन समितीकडे दिले जाते. मात्र, वनविभागाचे अधिकारी आपले चांगभलं करून घेण्यासाठी वन व्यवस्थापन समितीच्या अधिकारावर गदा आणत आहेत. एवढेच नव्हेतर अवैधरित्या कंत्राट देऊन तेंदूपत्ता संकलनही केले जात आहे. हा प्रकार सडक अर्जुनी तालुक्यातील खोबा वन व्यवस्थापन समितीतंर्गत येत असलेल्या वन–क्षेत्रामध्ये घडत आहे.

यासंदर्भात वन व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यानी पाठपुरावा केला असता वन विभागाच्या अधिकाऱ्याकडे याकडे दुर्लक्ष केले जात आहेत. या प्रकाराच्या माध्यमातून गोंदिया जिल्ह्यातील वनविभागाचे अधिकारी तेंदूपत्ता संकलनाच्या माध्यमातून मोठा गैरप्रकार करीत असल्याचा आरोप सर्व स्तरावर होऊ ला–गला आहे. राज्य शासनाने या गैरप्रकाराची चौकशी करून कंत्राटदाराशी साटेलोटे असलेल्या वन अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणीही वन व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून केली जात आहे.

## गैरप्रकारावर आळा घालण्याची गरज-माजी मंत्री बडोले



**चुकीच्या पद्धतीने कंत्राटदाराची नियुक्ती करणे, त्याचप्रमाणे काही खासगी लोक अधिकाऱ्यांच्या संगनमताने तेंदूपत्ता संकलन करीत आहेत. ज्यांना कंत्राट देण्यात आलेच नाही ते देखिल उघडपणे तेंदूपत्ता संकलन करीत आहेत. या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांचा रोजगार हिरावण्याचा काम वनविभागाचे अधिकारी करीत आहेत. गोंदिया जिल्ह्यात परंपरागत तेंदूपत्ता संकलनाचे काम केले जाते. या माध्यमातून हजारो महिला–पुरूषांना रोजगार प्राप्त होते. मात्र, अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभारामुळे हा गैरप्रकार जोरात सुरू आहे. विशेष म्हणजे, खोबा वन व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून सातत्याने तक्रार करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. यावरून अधिकाऱ्यांचा शिरजोरपणा कोणत्या स्तरावर पोहोचला आहे. हे लक्षात येते. खऱ्या अर्थाने राज्य शासनाने यावर लक्ष केंद्रीत करून चौकशी करावी, अशी मागणी माजीमंत्री राजकुमार बडोले यांनी केली.**

पान १ वरुन

रायपूर निवासी सत्येंद्र शाहू यांच दोन्ही पायाला मोठी जखम झालेली आहे तर हैद्राबाद निव–ासी उद्योगपती संजय थंपी यांच्या गळ्याला दुखापत झाली असून थंपी यांच्या गळ्याची जखम बघितल्यानंतर काहींनी जिवदान मिळाल्याचे म्हटले आहे. रायपूर निवासी शाहू यांचे राजकीय पाठबळ असून हे पर्यटन प्रेमी असल्याने गोंदियासह विविध ठिकाणी ते वन्यप्रेमी व वन्यजीव विभागाच्या कार्यक्रमांना सातत्याने हजेरी लावत असल्याची माहिती समोर आली आहे. यासंदर्भात वन्यजिव विभागाकडून अधिकृत माहिती प्रसिध्दीपत्रकाद्वारे जारी करण्यात आली नसली तरी घटनेबद्दल अधिक माहिती कार्यालयात येऊन घेऊन जावे असे सांगण्यात आले.

## कटंगीच्या सेवा सह.संस्थेच्या सचिवाला मारहाण

**गोंदिया–गोरेगाव** तालुक्यातील कटंगी बु.येथील सेवा सहकारी संस्थेच्या सचिवाला सदस्यत्व बनविण्याच्या मुद्याला घेऊन ४ लोकांनी सटवा येथे मारहाण केल्याची घटना आज मंगळव–ारला घडली असून गोंदिया ग्रामीण पोलिसांनी सचिवाच्या तक्रारीवरुन त्या मारहाण करणार्यांना ताब्यात घेतल्याचे व–् आहे.

# लेटलतीफ कर्मचाऱ्यांना पहिल्याच दिवशी अध्यक्षांनी लावली फटकार



**गोंदिया :** पदभार स्वीकारताच जिल्हा परिषद अध्यक्षांनी आपल्या कामाला सुरुवात केली असून, दुसऱ्याच दिवशी त्यांनी कार्यालयातील सर्वच विभागांमध्ये धडक देत कर्मचाऱ्यांची उपस्थिती बघितली. विशेष म्हणजे, त्यांनी हजेरीपत्रकच ताब्यात घेतले व त्यामुळे कर्मचारी चांगलेच धास्तावले आहेत.

गेल्या पावणेदोन वर्षांपासून पदाधिकारी विहीन असलेल्या जिल्हा परिषदेवर प्रशासक राज होते. प्रशासक हे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहिले असले तरी त्यांचा पाहिजे तसा वचक कर्मचारी वर्गावर दिसून आला नाही. त्यामुळेच की काय कर्मचारी कार्यालयी न वेळेत वेळेवर येण्याऐवजी उशिरा येत असल्याचे नवनिर्वाचित अध्यक्षांच्या निदर्शनास आल्याने नवनिर्वाचत अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी शुक्रवारी (दि . १३) आठवड्याच्या शेवटच्या दिवशीच जिल्हा परिषद इमारती मधील सर्वच कार्यालयात धडक देत संबंधित कार्यालयातील हजेरीपत्रकच आपल्या ताब्यात घेतल्याने कर्मचारी वर्गात एकच खळबळ माजली आहे.

विशेष म्हणजे, शुक्रवारी विविध विकासकामे व योजनांचा आढावा घेण्यासाठी अध्यक्षांनी बैठकसुध्दा आयोजित केली आहे. अध्यक्ष रहागडांले यांच्या औचक निरीक्षणामुळे उशिरा येणाऱ्या कर्मचारी वर्गात एक दहशत निर्माण झाली. त्यामुळे उशिरा येणाऱ्यांवर किती वचक राहतो, याकडे लक्ष द्यावे लागेल.

यापूर्वी ही जिल्हा परिषदेत कित्येक पदाधिकरी व अधिकारी आलेत व गेलेत. पदभार घेताच त्यांनी आपला रुबाब दाखविण्यासा ठी अचानक कार्यालय गाठून कर्मचाऱ्यांची उपस्थिती बघणे आदी प्रयोग केलेत. यामुळे सुरुवातीला कर्मचाऱ्यांना ही ते कडक असावे, असे वाटायचे. मात्र काही दिवसानंतर पुन्हा तीच कार्यप्रणाली सुरू होते. असे आजवर दि सून येत आहे. अशात आता जिल्हा परिषदेचा कारभा र तरुणाच्या हाती देण्यात आला असून, त्यांनी कामाची सुरुवात चांगली केली. मात्र, असाच उत्साह कायम असावा, फक्त चार दिन की चांदनी नको.

# शेतकरी धान खरेदी पासून वंचित राहणार नाही : खा.मेंढे

**गोंदिया:** भंडारा गोंदिया जिल्ह्यातील रब्बी धानाच्या शासकीय खरेदी बाबत महाराष्ट्र राज्य शासनाने पाठविलेल्या चुकीच्या माहितीमुळे धान उत्प–ादक शेतकरी काळजीत पडला होता. शेतकऱ्यांची ही चिंता दूर करण्याच्या दृष्टीने खा. सुनिल मेंढे यांनी दिल्ली येथे अधिग्रहण आणि सार्वजनिक वितरण धोरणाचे संचालक मकरंद फडके यांच्याशी चर्चा केली. राज्य शासनाने केंद्राला पाठविलेल्या अपुऱ्या व त्रोटक माहितीमुळे मागील वर्षीएवढे धान खरेदीचे उद्दिष्ट केंद्र शासन देऊ शकले नाही. धानाबाबतची योग्य माहिती पाठविल्यावर धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवून देण्यात येईल. तसेच दोन्ही जिल्ह्यातील कोणताही धान उत्पादक शेतकरी शासकीय धान खर–ेदी पासून वंचित राहणार नाही या दृष्टीने केंद्र सरकार सर्वतोपरी काळजी घेईल असे खा.मेंढे यांनी सांगितले.



शेतकऱ्यांकडून एकरी फक्त ८ क्विंटल धान खरेदी होईल अशी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पसरवली जात होती. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला होता. परंतु आज केंद्र स्तरावर झालेल्या चर्चे प्रमाणे एकरी १६ क्विंटल धान खरेदी होणार आहे. शेतकऱ्यांनी त्यामुळे कुठलीही चिंता करूनये असे खा.सुनील मेंढे यांनी सांगितले.

# शाळेच्या पहिल्याच दिवशी मिळणार पाठयपुस्तके




**गोंदिया:** 'सारे शिकूया पुढे जाऊया' असे म्हणत सुरू केलेल्या समग्र शिक्षण मोहिमेअंतर्गत जिल्ह्या–तील पहिले ते आठवीच्या शाळांमधील १ लाख ४९ हजार ५५० विद्यार्थ्यांना यंदा मोफत पाठ्यपुस्तक योजनेचा लाभ दिला जाणार आहे. संबंधित पाठ्यपुस्तकांचा जिल्हा कार्यालयाकडून तालुकास्तरावरील गटशिक्षणाधिकारी कार्यालयात पुरवठा करण्यात येत आहे. तेथून शाळास्तरावर पुस्तके वितरित करण्यात येणार आहेत. या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशीच पुस्तके देण्याचे नियोजन केले आहे.

शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके उपलब्ध व्हावीत, यासाठी शिक्षण विभागामार्फत नियोजन केले गेले. त्यानुसार सन २०२२–२३ या शैक्षणिक वर्षात जिल्ह्यात १ लाख ४९ हजार ५५० विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वितरण केले जाणार आहे. यामध्ये मराठी माध्यमाच्या ४ लाख ६६ हजार ९२६७६२, हिंदी माध्यमाच्या १ लाख २ हजार ४६९, इंग्रजी माध्यमाच्या २ हजार २७५ व उर्दू माध्यमाच्या ७४४ पाठ्यपुस्तकांचा समावेश आहे. जिल्ह्यातील शाळा २७ जूनपासून सुरु होणार आहेत. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध व्हावी, या दृष्टीने शिक्षण विभागाने नियोजन केले आहे. त्यानुरुप कोणत्याही स्थितीत सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी पुस्तके देऊन त्यांचे शाळेत स्वागत करण्याचे नियोजन केले आहे. नवगतांचे शिक्षणाच्या प्रवाहात वाजत गाजत स्वागत करण्यात येणार आहे.

सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अनुदानित माध्यमिक शाळा यामधील विद्यार्थी संख्येप्रमाणे पाठ्यपुस्तके प्राप्त झाले आहेत. पाठ्यपुस्तके लवकरच शाळांपर्यंत वितरित करून शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांना पाठ्यपुस्तके देण्याचे नियोजन केले असल्याचे गोंदियाचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

# शेकडो शिक्षक अतिरिक्त ठरण्याची भीती

**नागपूर :** शैक्षणिक वर्ष २०२१–२२ची संचमान्यता आधार क्रमांकाच्या आधारे ठरवून अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन ३१ मेपर्यंत करावे, असे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. मात्र शैक्षणिक सत्र २०२०–२१ व २०२१–२२ मध्ये महाराष्ट्रातील शाळा करोना प्रादुर्भावामुळे बंद असल्याने शाळांना विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढवता आली नाही. त्यामुळे सत्र २०२१–२२च्या संचमान्यतेत हजारो शिक्षक अतिरिक्त ठरण्याचा धोका आहे.



शैक्षणिक वर्ष २०२१–२२ची संचमान्यता आधार क्रमांकाच्या आधारे करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. त्यानुसार राज्यातील सर्व शाळांची तात्पुरती संचमान्यता ३० डिसेंबर २०२१ रोजीच्या आधार क्रमांक नोंदणी असलेल्या विद्यार्थी संख्येच्या आधारे करण्यात आली आहे.


सद्य:स्थितीत राज्यात आधार क्रमांक असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ८७ टक्के आहे. ३१ मार्च २०२२ पर्यंत आधार क्रमांक नोंद केलेले विद्यार्थी संच मान्यतेकरिता ग्राह्य धरण्यात यावे व ही संच मान्यता अंतिम झाल्यानंतर ऑफलाइन पद्धतीने समुपदेशन घेऊन अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन ३१ मेपर्यंत किंवा पूर्वी करावे, असे आदेश शिक्षण संचालकांनी दिले. मात्र शासनाने दोन वर्षे तरी संचमान्यता करून शिक्षकांना अतिरिक्त ठरवू नये व पटसंख्या वाढवण्याची संधी द्यावी, अशी मागणी शिक्षक भारती व भाजप शिक्षक आघाडीसह अन्य संघटनांनी केली आहे.

गेल्या दोन वर्षांत करोनाचा अतिशय मोठा फटका शाळांना बसला. बऱ्याच शाळा बंद असल्यामुळे हव्या त्या पद्धतीने विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया राबवता आली नाही. त्यामुळे बऱ्याच अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची पटसंख्या कमी झाली आहे. तसेच आधार जुळणी होत नसल्याने बरेच विद्यार्थी शाळेत व पटावर प्रत्यक्ष उपस्थित असूनही संचमान्यतेमध्ये दिसत नाहीत. त्यामुळे अनेक शाळांमध्ये मोठया प्रमाणात शिक्षक अतिरिक्त ठरताहेत.

**संचमान्यतेला विरोध..**

करोनाकाळात शाळा बंद असल्याने शाळांची पटसंख्या कमी झाली आहे. परिणामी, आता मोठया प्रमाणात शिक्षक अतिरिक्त होण्याचा धोका असल्याने संचमान्यतेला विरोध होत आहे.

# पांगोलीच्या संवर्धनासाठी कोण घेणार पुढाकार



**गोंदिया :** गोंदिया जिल्ह्यासाठी वरदान ठरलेली पांगोली नदी सद्या परिस्थीतीत शेवटच्या घटका मोजत आहे.तिचे अस्तित्व नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.हे नदीचे पात्र कोरडे पडल्याने पाण्याअभावी शेतकरी, नागरिक, पशु–पक्षींचे हाल होत आहेत. जीवनदायीनी पांगोली नदीच्या संरक्षण व संवर्धनासाठी अनेकदा निवेदन दिले.पण याची अद्यापही दखल घेण्यात आली नाही.

भविष्यात उद्भवणाऱ्या जलसंकटाची चाहुल लागली नाही, ही मोठी शोकांतिका आहे.मात्र या नदीचे सरंक्षण, संवर्धन व विकास व्हावा, यासाठी जिल्ह्यात हळूहळू जनजागृती होऊन जनमत तयार होत आहे,ही आनंदाची बाब आहे.

गोरेगाव तालुक्यातील तेढा तलावातून या नदीचा उगम झाला आहे. गोंदिया तालुक्यातील कामठा नजिक छिपीया या गावाजवळ देवरी–आमगाव तालुक्याकडून येणारी वाघ नदी व पांगोली नदीचा पवित्र संगम होतो.पुढे जाऊन ही नदी मध्यप्रदेश सीमा क्षेत्रात वाहते.गोरेगाव तालुक्यात २५ कि.मी.,गोंदिया तालुक्यात ३० कि.मी. व आमगाव तालुक्यात १५ कि.मी.असा जवळपास एकूण ७० कि.मी. या नदीचे प्रवाह क्षेत्र आहे.

एकेकाळी नदीच्या पाण्यावर नदी क्षेत्रातील शेतकरी शेती पिकवायचे नदीच्या पाण्यावर दुबार पीक घेऊन प्रसंगी बागायती शेती करायचे.नदीच्या पाण्यात नदी काठी असलेल्या राईस मिल, लाख कारखाने, औद्योगिक उपक्रमांमधून सोडले जाणाऱ्या दूषित पाण्यामुळे प्रदूषण वाढले आहे.

## नदीची सिंचन क्षमता संपुष्टत

**मानवी हस्तक्षेपांमुळे नदीत पसरत असलेल्या प्रदूषणामुळे, नदी काठची झाडे–झुडपांची नागरिकांनी अवैधपणे केलेल्या कटाईमुळे जलप्रदूषणासह, नदीच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या शेतजमिनीच्या मातीचे ही प्रदूषण झाले. नदी परिसरातील पाण्याची पातळी ही खोलवर गेली आहे. मार्च–एप्रिल महिन्यातच विहिरी कोरड्या पडू लागल्या. बोअरवेल खोदल्यावरही पाणी २५० फुटावरच ला–गते. नदीची सिंचन क्षमता संपुष्टात आल्यामुळे शेती व शेतकरी ही संकटात सापडला आहे.**

## पांगोली नदीवर बंधारे बांधा

**उन्हाळ्यात शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी, जनावरांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी नदी पात्रातून गाळ उपसा करून नदीचे खोलीकरण करणे, नदी प्रवाह क्षेत्रात जागोजागी ३ ते ५ कि.मी.अंतरावर कोल्हापुरी धतीचे बंधारे बांधणे, नदीच्या दोन्ही बाजूच्या काठांची दुरुस्ती करणे, नदीच्या दोन्ही काठांवर पर्यावरणास पोषक झाडे लावणे, नदी काठावरील राईस मिल्स, लाख कारखाने आदी औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी नदी पात्रात येण्यापासून मज्जाव करणे गरजेचे असल्याचे समाजोन्नती बहु. विकास संस्था गोंदियाचे सचिव तिर्थराज उके यांनी सांगितले.**

# ओडिशावरून गोंदियाला येणारा गांजा पकडला



**गोंदिया:** ओडिशा येथून गोंदियाला येणारा २८ किलो ५० ग्रॅम गांजा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी (दि.१२) रात्री डव्वा येथे पकडला. या प्रकरणात अटक करण्यात आलेले चौघेही आरोपी येथील असून त्या आरोपींना गुरुवारपर्यंत (दि.१९) पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीत संजय काशिनाथ बन्स–ोड (४१, रा. वॉर्ड क्रमांक १७, श्रीनगर), अजय हगरु राहुलकर (५३, रा.सुंदरनगर, भीमनगर), गुलाब घनश्याम गिरी (३१, रा. मजितपूर, गंगाझरी) व अरुण केवल चौरे (३७, रा. कुंभारटोली) यांचा समावेश आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गुरुवारी (दि.१२) सायंकाळी डुग्गीपार परिसरात पेट्रोलिंग करीत असताना गोंदिया येथील अरुण चौरे नावाची व्यक्ती त्याची कार क्रमांक एमएच ०४–इक्यू ५३३३ ने ओडिशा येथून गांजा घेऊन गोंदियाला येत आहे अशी माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बबन आव्हाड, सहायक पोलीस निरीक्षक विजय शिंदे, पोलीस उपनिरीक्षक तेजेन्द्र मेर्शाम, सहायक फौजदार गोपाल कापगते, पोलीस हवालदार तु–लसीदास लुटे, पोलीस नायक सोमेंद्रसिह तुरकर, पोलीस नायक रियाज शेख, पोलीस शिपाई संतोष केदार, विजय मानकर, चालक पोलीस हवालदार बंजार यांनी डुग्गीपार पोलीस ठाण्यांतर्गत ग्राम डव्वा गाठून गावातील मुख्य रस्त्यावरील ताज चिकन सेंटरसमोर नाकाबंदी केली.

सायंकाळी ७.३५ वाजता कार क्रमांक एमएच ०४–इक्यू ५३३३वकार क्रमांक सिजी ०४–झेडएक्स ७७५५ या वाहनांतून २८ किलो ५० ग्रॅम वजनाचा गांजा किंमत तीन लाख ३६ हजार ६०० रुपये, दोन चारचाकी वाहने किंमत ७ लाख व दोन मोबाईल किंमत ११ हजार असा एकूण १० लाख ४७ हजार ६०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. चारही आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींविरुद्ध डुग्गीपार पोलीस ठाण्यात मादक पदार्थ विरोधी अधिनियम कलम ८(क), २०(क),२९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या आरोपींना गुरुवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.